CMYK

**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी
9422295333
8623880100

# पार्श्वभूमी

**रियांश एन्टरप्राईजेस**
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.,
५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ५५ वा फोन २३०१०१ दिनांक २२ जानेवारी २०२६ गुरुवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# एमआयएमला १२५ जागा मिळाल्याचा बाऊ करु नका
# हरल्यामुळे काँग्रेस, राष्ट्रवादीवाल्यांचा जळफळाट झालाय



**बीड दि.२१ (प्रतिनिधी):– या अगोदर वर्षानुवर्षे जी मते काँग्रेसला मिळत होती त्यानंतर राष्ट्रवादीकडे वळली ती मते आता एमआयएमला मिळू लागली आहेत. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या महानगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये एमआयएमचे १२५ नगर सेवक निवडूण आले. त्याचा बाऊ काँग्रेस आणि राष्ट्रवादीवाले करु लागले आहेत. परंतु त्यांना हे कळेना की एमआयएम वाढलं नाही, तुम्ही कमी झालात. तुमच्याकडची मते तिकडे गेली यामुळे काँग्रेस, राष्ट्रवादीवाल्यांचा जळफळाट वाढलाय. ज्या मुस्लिम समाजाचला काँग्रेस आणि राष्ट्रवादीने गृहीत धरले होते, वोट बँक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे, आता तेच स्वत: राजकारणात निर्णय प्रक्रियेत येऊ लागल्याने काँग्रेसवाले एमआयएमला भाजपाची बी टीम म्हणून हिणवू लागले आहेत. परंतु याच एमआयएमने अनेक महानगर पालिकांमध्ये काँग्रेसची वाट लावली आहे. हे असं का झालं ? याचं चिंतन करण्यापेक्षा टीका करणे आणि टोमणे मारण्यातच काँग्रेस, राष्ट्रवादीवाले धन्यता मानत आहेत.**

नुकत्याच झालेल्या २९ महानगर पालिकांच्या निवडणुकींमध्ये ओवीसींच्या एमआयएम पक्षाला १२५ जागा मिळाल्या. छत्रपती संभाजी नगर सारख्या शहरात ३३ नगर सेवक एमआयएमचे निवडूण आले. त्यामुळे एमआयएम वाढत आहे, धर्मावर आधारीत मतदान होत आहे अशी भीती काँग्रेस आणि राष्ट्रवादीवाले दाखवत आहेत. या आधी कित्येक वर्षापासुन ही सर्व मते काँग्रेस, राष्ट्रवादीला पडत होती तेंव्हा त्यांना गोड वाटत होतं. महानगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये २९ पैकी २४ महानगर पालिकेत पवार साहेबांच्या तुतारीला एकही जागा मिळालेली नाही. तर अन्य मोठ्या शहरातही काँग्रेसला एमआयएमच्या उमेदवारांचा मोठा फटका बसला. गेल्या २०-२५ वर्षामध्ये शहरीकरण मोठ्या प्रमाणात झालं. शिक्षण, व्यापार, उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुस्लिम समाज शहरात आला, एका विशीष्ट भागात तो वस्ती करुन एकत्रित राहू लागला आणि ते मोहल्ले मुस्लिम मोहल्ले म्हणून वाढले. त्यातच ओवीसीसारख्या आक्रमक शैलीत बाजु मांडणाऱ्या नेत्याने महाराष्ट्रात शिरकाव केला. मुस्लिमांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन दिली, त्यांना जागे केले. परिणामी काँग्रेस, राष्ट्रवादीपासून मुस्लिम समाज दुरावत चालला असल्याचे चित्र आहे. काँग्रेसवाले, राष्ट्रवादीवाले मुस्लिम समाजाची मते म्हणजे आपली हक्काची मते आहेत, त्यांना गृहीत धरुन ते चालायचे. या समाजाचा फक्त वोट बँक म्हणून काँग्रेसने वापर केला. एमआयएम निवडूण आले यापेक्षा काँग्रेसवाले सपाटून पडले याचा जळफळाट त्यांना होत आहे. आपण कुठे कमी पडत आहोत, आपले मतदार आपल्यापासून का दूर जात आहेत, यावर विचारमंथन करण्यापेक्षा ते एमआयएमला पान २ वर

## पाकिस्तानवर टीका करत ओवीसींनी जगभरात देशाची बाजु मांडली

पहलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी भारतीय पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारने देशभरात भारताचे प्रतिनिधी बाजु मांडण्यासाठी पाठविले होते. या शिष्टमंडळामध्ये एमआयएमचे खा.असोदुद्दीन ओवेसी हे होते. त्यांनी भारताची बाजु अत्यंत प्रभावीपणे परदेशामध्ये मांडली. पाकिस्तान कशा पद्धतीने अतिरेकी कारवाया करत आहे हे जगाला पटवून सांगितले. ओवीसींच्या या भूमिकेचे सर्वत्र कौतुकही होत आहे.

## अनेक शहरांमध्ये एमआयएमचे हिंदु नगर सेवक

नुकत्याच झालेल्या महानगर पालिकांच्या निवडणुकांमध्ये अनेक शहरांमध्ये एमआयएमच्या तिकीटावर हिंदु उमेदवार विजयी झालेले आहेत. छत्रपती संभाजी नगरमध्ये असे अनेक उमेदवार एमआयएमचे नगर सेवक झालेले आहेत. सर्वांना सोबत घेऊन काम करा, आपापल्या भागातील समस्या, विकासाचे प्रश्न प्रभावीपणे मांडा अशा प्रकारचा संदेश ओवीसींनी एमआयएमच्या सर्व नवनिर्वाचीत नगर सेवकांना दिला आहे.

## संभाजीनगरमध्ये यापुर्वीही अनेक मुस्लिम नेते निवडूण आले

छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमचे ३३ नगर सेवक निवडूण आले आणि काँग्रेसवाल्यांनी आरडाओरड सुरु केली. भाजपची बी टीम असल्याची टीका सुरु केली. पण या शहरात अब्दुल अजीम, अमानउल्ला मोतीवाला, रफीक झकेरिया या सारख्या नेत्यांना तेथील मुस्लिम समाजाने विजयी केले. आमदार, खासदार, मंत्री केले. आता तेच मतदार ओवीसींच्या पाठिशी उभे राहिल्याचे चित्र आहे.

## लिफ्ट बंद म्हणून नातेवाईकांनी तिसऱ्या मजल्यावरुन पेशंट सोनोग्राफीसाठी खाली आणला आणि नर्स वेळ संपली म्हणून कुलूप लावून निघून गेली

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- येथील जिल्हा रुग्णालयातील गलथान कारभाराचा नमुना समोर आला आहे. रुग्णालयाची लिफ्ट बंद असल्यामुळे नातेवाईकांनी तिसऱ्या मजल्यावरुन एका वयस्कर महिलेला सोनोग्राफीसाठी खाली आणले. मात्र सोनोग्राफी सेंटरसमोर सदर महिलेला झोपविले असता पेशंट आणि नातेवाईकांसमोर सोनोग्राफी सेंटरमधील नर्सने कक्षाचा दरवाजा लावून वेळ संपली म्हणून ती निघून झाली. इतकी असंवेदनशीलता कर्मचाऱ्यामंध्ये कुठून निर्माण झाली आहे. सदर नर्सवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.



येथील जिल्हा रुग्णालयामध्ये ५४ क्रमांकाचा वार्ड जो तिसऱ्या मजल्यावर आहे तिथे ॲडमीट असलेल्या एका वृद्ध महिलेला नातेवाईकांनी लिफ्ट बंद असल्यामुळे स्ट्रेचरवर टाकून पायऱ्याने खालच्या मजल्यावर सोनोग्राफी सेंटरमध्ये आणले. सोनोग्राफी सेंटरसमोर स्ट्रेचर ठेवले, नातेवाईक बाजुला उभे राहिले. मात्र सोनोग्राफी सेंटरमध्ये कार्यरत असलेल्या नर्सने वेळ संपली आहे असे म्हणत सोनोग्राफी सेंटरचा दरवाजा बंद पान २ वर

## माजलगाव शहर पोलिसांची हेल्मेट सक्तीची कारवाई सुरू

### दुचाकी वाहनधारकांनी हेल्मेट वापरावे पो.नि.राहुल सुर्यतळ



माजलगाव दि.२१ (प्रतिनिधी):- दिवसेंदिवस दुचाकीवर अपघात झाल्याने मृत्यूचे प्रमाण वाढत असल्याने शासनाने दुचाकी स्वरांनी हेल्मेट वापरणे शासनाने सक्तीचे केले असून ही मोहीम माजलगाव शहर पोलीस स्टेशन प्रभावीपणे राबवत आहेत. दुचाकी वाहनधारकांनी हेल्मेट वापरावे व दंड टाळावा असे आवाहन शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी केले आहे. दुचाकी वाहनधारकांचे अपघातामध्ये मृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे हे अपघाताचे मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने दुचाकीस्वारांना हेल्मेट सक्ती केली आहे. त्या आदेशाचे पालन माजलगाव शहर पोलिसांनी केले असून शहर पोलिसांच्या वतीने वाहनधारकांना हेल्मेट सक्ती केली जात आहे व हेल्मेट न वापरण्यावर कारवाई केली जात आहे. वाहनधारकांनी घराबाहेर निघाल्यानंतर आपण जसे मोबाईल गॉगल इतर साहित्य सोबत घेतो त्याचप्रमाणे आता वाहनधारकांनी पान २ वर

## फारुक पटेल, मुजीब, आशफाक तुम्ही गुंडांची साथ देऊ नका

### हल्ला झालेल्या मुस्लिम युवतीचा व्हीडीओ व्हायरल

### बिलाल, सनाउल्लाने भरदिवसा हल्ला केल्याचा महिलेचा आरोप

**बीड दि.२१ (प्रतिनिधी):– प्रॉपर्टीच्या वादातून महिलांना झालेल्या मारहाणीचा एक व्हीडीओ सध्या प्रसारमाध्यमांवर व्हायरल होत आहे. बिलाल पटेल आणि सनाउल्ला यांनी हा हल्ला केला. यांच्यामुळे आमच्या जिवाला धोका आहे. आम्ही पोलिसात जाऊन तक्रारी दिल्या तरी पोलीस दखल घेत नाहीत. बिलाल हा विजयराजेंचा माणूस आहे, गोरगरीबांना न्याय मिळणार का ? एका मुस्लिम महिलेवर हल्ला होत असतांना आणि आमच्या कुटुंबाच्या जिवाला धोका निर्माण झालेला असतांना समाजातील मोठे नेते फारुक पटेल, मुजीबभाई, आशफाक तुम्ही गप्प का ? गुंडांची साथ देऊ नका अशी आर्त हाक सदर महिलेने दिली आहे.**

बीड शहरामध्ये तहसिल कार्यालयासमोर चार-पाच दिवसापुर्वी एका मुस्लिम महिलेला गुंडांनी मारहाण केली. या मारहाणीची व्हीडीओही व्हायरल झालेला आहे. मारहाण करतांना मुस्लिम महिला मोठ्याने ओरडत आहे. दोन-तीन महिलांना मारहाण झाली. या महिलांना सध्या जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आलेला आहे. एम.एस्सी., बी.एड. अशी उच्चशिक्षीत तरुणी जी मुंबईमध्ये प्राध्यापक म्हणून काम करत आहे. पान २ वर

## एस.पीं.नी सांगुनही गुन्हा दाखल नाही

सदर प्रकरणातील मारहाण झालेली महिला पोलीस अधीक्षकांना भेटण्यासाठी गेलेली होती. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी या प्रकरणात सीसी टीव्ही फुटेज पाहून गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते, परंतु अद्यापही गुन्हा दाखल झालेला नाही. सदर महिलांवर जिल्हा रुग्णालयात उपचार चालू आहेत. या महिलांना डिस्चार्ज द्या यासाठी गुंडांकडून दबाव आणला जात असल्याचे सदर महिलेने सांगितले आहे.

## आष्टी तहसिलदार वैशाली पाटील यांची हुकुमशाही

### भ्रष्ट व भोंगळ कारभाराला कंटाळून सर्व ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- तहसिलदार आष्टी श्रीमती वैशाली पाटील यांचे हुकुमशाही व दडपशाही कारभारामुळे आष्टी तालुक्यातील सर्व ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी बेमुदत सामुहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे.
दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तहसिलदार आष्टी श्रीमती वैशाली पाटील या सर्व ग्राममहसूल अधिकारी मंडळ अधिकारी यांना एकदम खालच्या पातळीची वागणूक देत आहे. प्रत्येक कामात दमदाटी करून अर्वाच्च भाषेत बोलतात, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे व भीतीचे वातावरण झाले आहे. तहसीलदार मॅडम ७ दिवसाच्या आठवड्यामध्ये कमीत कमी ५ दिवस बैठका घेतात. त्यामुळे लोकांचे काम होत नाहीत. त्यांच्या मर्जीतले काही मोजके लोक सोडता प्रत्येकाला टार्गेट करून खालच्या पातळीने बोलतात. बैठकीमध्ये टार्गेट करून मानसिक पान २ वर

## १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह

### एएचटीयू टीमने मुलीला ताब्यात घेत पोलीस ठाण्यात केला गुन्हा दाखल

बीड दि २१ (प्रतिनिधी):- अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या प्रभारी अधिकारी, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना पाच जानेवारी रोजी मिळालेल्या गुप्त माहितीवरून आम्ला ता. गेवराई येथे १९ रोजी होत असलेल्या एका १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह संदर्भात तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.
यासंदर्भात टीमला माहिती मिळाली की सदर गावात बालविवाह झाला असून आज सत्यनारायणाची पूजा आहे. त्यावरून, -क्ढण टीम अम्ला गावात दाखल झाली. मिळालेल्या माहितीनुसार बालविवाह झालेल्या घरी टीम गेली असता, पोलीस आल्याचे बघून सर्व पाहुण्यांनी इकडे पान २ वर

## “हिंद-दी-चादर”



**दि.२४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे -डॉ.जेसवाणी**

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वा शहीदी एवं श्री गुरु गोविंदसिंघजी ३५० वा गुरुतागद्दी शताब्दी समागमच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान वाघाळा नांदेड येथे उपस्थित राहुन आपले भाग्याचे साक्षीदार बना. गुरुनानक देवाला व हिंदुंनी विशेष सिख, सीकलकर, बंजारा, लबानो, सिंधी समाज, पंजाबी समाज व गुरुला लबाना मानणाऱ्या सर्व समाजाने लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन **डॉ.जेसवाणी** (अध्यक्ष सिंधी व पंजाबी समाज), **दिपक आहुजा** (अध्यक्ष पंजाबी समाज), **सौ.प्रित आनंद कुकडेजा** (अध्यक्ष महिला सिंधी व पंजाबी समाज बीड यांनी केले.
16515

**WE'RE HIRING**
**RENAULT BEED**

| SALES | | |
|---|---|---|
| Post | Exp. | No of Post |
| Sales Executive | 1 | 3 |
| Accountant | 2 | 1 |
| SERVICE | | |
| Technician | 1 | 1 |
| Helper | 1 | |

GURUKRUPA MOTORS PVT LTD
Dhoppad Complex, Jalana Rd, Opp. Sai Place Beed,431122.
Mobile No.7722050301, 8888800625
16511-13431

**प्लॉट विकणे आहे**
माजलगाव शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन बस स्टॅन्डपासून हाकेच्या अंतरावर असलेले रंगोली कॉर्नर येथील, हॉटेल मराठाच्या शेजारी, बीड रोड टच 25 X 132 या साईजचा प्लॉट योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे.
:: संपर्क ::
Mob. 96372 21441


## स्वच्छता, लाइट, पाणी, रस्त्यासाठी तुतारी गट आक्रमक

### आज मागणी करतोय उद्या संघर्ष करू–खुर्शीद आलम



बीड दि.२१ (प्रतिनिधी):- बीड शहरातील स्वच्छता, लाईट, पाणी व शहरातील रस्ते विकास व इतर विविध मागण्या संदर्भात आज तुतारी गटाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांच्या अध्यक्षतेखाली दुबार मुख्याधिकाऱ्याची बैठक घेण्यात आली असून मुख्याधिकारी फडसे साहेबांनी सदर बैठकीला प्रतिसाद दिले आहे, नागरिकांच्या समस्या संदर्भात तुतारी गटाने ही दुसरी बैठक घेतली असून मुख्याधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करून निवेदनात म्हटले आहे की पान २ वर

**नवरंग गणेश मंडळ**
बालाजी मंदिर समोर, बीड.



आज दि.२२ जानेवारी २०२६
**गणेश जन्म सोहळा**
आज दुपारी १२ वाजता
**गणेश विवाह**
दि.२४ जानेवारी २०२६ रोजी
वेळ : सकाळी ७ वाजता

CMYK

# उद्योजक विजयकुमार अंडील व समाज भूषण ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांचा वडवणीत पुरस्काराने होणार सन्मान

वडवणी दि.२१ (प्रतिनिधी):- वडवणी येथील उद्योजक विजयकुमार अंबादासराव अंडील यांना उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्या करत उद्योगाच्या माध्यमातून अनेक तरुणांच्या हाताला काम दिले, बेरोजगारांना नोकरी दिली, अनेक तरुणांना मदतीचा हात देऊन त्यांना व्यवसायला मदत केली, विजयकुमार अंडील दूरदृष्टीमुळे अनेक तरुणांच्या हाताला काम मिळाले, तर अनेकांनी गावागावात व्यवसाय सुरू केला, त्यांच्या सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन उद्योगरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.तसेच ही.भ.प. नवनाथ महाराज चिंनके यांना समाज भूषण पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान होणार आहे.



हा सन्मान संतभूमी संरक्षक संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय मराठा महासंघ वारकरी आध्यात्मिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. दि.२५ जानेवारी २०२६ रविवार रोजी सकाळी ११ वाजता वडवणी येथील हॉटेल कृष्णा फंक्शन हॉल येथे आयोजित करण्यात आला आहे.

तसेच या कार्यक्रमांमध्ये संत श्रेष्ठ जगद्गुरू तुकोबारायांच्या पदरस्पर्शाने पावन झालेल्या तपभूमीला बिल्डर व राजकारण्यांच्या विळख्यातून वाचवण्यासाठी या भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेला मोठ्या संख्येने भाविक, नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तुकयाभक्त मधुसूदन पाटील महाराज (संतभूमी संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य) असणार असून कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधीपती, बंकटस्वामी संस्थान) यांच्या शुभहस्ते होणार आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. शेषेराव बापू जगताप (नगराध्यक्ष, नगरपंचायत वडवणी) हे असतील. यावेळी ह.भ.प. राजाराम महाराज सूर्यवंशी (देवगाव), मा. श्री. पंजाबरावजी मस्के पाटील, मा. श्री. प्रा. शिवराम सोंडगे (जिल्हाध्यक्ष, अध्यात्मिक आघाडी), मा. श्री. अशोक हिंगे, मा. माधवी माने (कार्याध्यक्ष, संताई महाराष्ट्र राज्य), मा. श्री. गंगाधर काकुटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. बाबरी मुंडे मा. श्री. प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे, मा. श्री. सचिन पाटील यरळीकर (संपर्क प्रमुख, संतभूमी समिती), ह.भ.प. नवनाथ महाराज चिणके (समाजभूषण पुरस्काराने सन्मानित), मा. श्री. रामभाऊ मोहिते पाटील (मराठवाडा अध्यक्ष), मा. श्री. बन्सीभाऊ मुंडे (उपनगराध्यक्ष, वडवणी), ह.भ.प. बाबासाहेब महाराज चारदरीकर, मा. श्री. सुरेश फावडे यांची उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमाचे संयोजन श्री. बब्रूवानजी शेंडगे पाटील, ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके, डॉ. मारोती आंधळे, श्री. महादेव जमाले पाटील, श्री. विनायक बप्पा मुळे, श्री. संतोष दादा डावकर, श्री. सुग्रीवजी मुंडे, श्री. दिनुभाऊ शेडगे, श्री. शंकरराव आंधळे, प्रा. धुराजी राऊत सर, ह.भ.प. सुनील महाराज अंडील, श्री. गोविंद दिलीपराव मस्के पाटील आदी मान्यवर करत आहेत.

## गणेश जयंती निमीत्त श्री मनोकामना गणेश जन्म उत्सव समितीच्या वतीने धार्मिक कार्यक्रम

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- आज गणेश जयंती निमित्ताने पेठ बीड भागातील माजलगावकर मठ येथे श्री मनोकामना गणेश जन्म उत्सव समितीच्या वतीने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि.२२/१/२०२६ गुरुवार रोजी सकाळी सात वाजता श्री गणेश अभिषेक महापूजा, सकाळी नऊ वाजता अथर्वशीर्ष पठण, सकाळी दहा वाजून पाच मिनिटांनी गणेश जन्म उत्सव कार्यक्रम, सकाळी अकरा वाजता श्री चे भव्य पालखी सोहळा पालखीचा मार्ग हा शनिवार पेठ बुरुड गल्ली हिरालाल चौक मार्गाने माजलगावकर मठ येथे पालखीचा समारोप होईल . तसेच दुपारी एक ते पाच या दरम्यान महाप्रसादाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवाचा लाभ सर्व गणेश भक्तांनी घ्यावा असे आवाहन मनोकामना गणेश उत्सव समिती व वीरशैव समाज व गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# बॅक-डेट स्टॅम्प पेपरबाबत सुप्रीम कोर्टाचा महत्त्वाचा निकाल

## – ॲड.प्रविण नेहरकर, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- भारतात अनेकदा ''बॅक-डेट'' किंवा जुना non-judicial stamp paper वापरणे कायदेशीर आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. या संदर्भात सुप्रीम कोर्टाने Thiruvengada Pillai vs. Navaneethammal अपी. (२००८) या प्रकरणात अतिशय स्पष्ट भूमिका मांडलेली आहे.

स्टॅम्प पेपरला Expiry नसते

सुप्रीम कोर्टाने ठामपणे सांगितले आहे की Indian Stamp Act, १८९९ मध्ये पेप-judicial stamp paper साठी कोणतीही "expiry date' दिलेली नाही.

म्हणजेच, एकदा स्टॅम्प पेपर कायदेशीररित्या खरेदी झाला असेल, तर तो कितीही जुना असला तरीही वापरता येतो, तो खराब झालेला किंवा वापरण्यायोग्य नसल्यासच अडचण येऊ शकते.

Section ५४ - केवळ Refund साठी मर्यादा

कायद्यातील ड्शलींळेप ५४ नुसार, वापरात न आलेला स्टॅम्प पेपर ६ महिन्यांच्या आत Collector कडे दिल्यास त्याचा refund मिळू शकतो. परंतु ही मर्यादा फक्त ेशिर्षीपव साठी आहे, वापरण्यासाठी नाही. त्यामुळे १०, १५ किंवा २० वर्षांपूर्वी खरेदी केलेला non-judicial stamp paper देखील कायदेशीर दस्तऐवजासाठी वापरता येतो.

स्टॅम्प पेपर जुना असणे म्हणजे दस्तऐवज अवैध नव्हे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, स्टॅम्प पेपरवर छापलेली तारीख वेगळी असणे किंवा तो जुना असणे, यामुळे दस्तऐवज आपोआप अवैध ठरत नाही.उदाहरणार्थ, २०२६ मध्ये तयार झालेल्या करारासाठी जर २०१० किंवा २००० मध्ये खरेदी केलेला स्टॅम्प पेपर वापरला, तरी तो फक्त ''जुना आहे'' या कारणावरून रद्द करता येत नाही.

मात्र बॅक-डेट आणि फसवणूक वेगळी गोष्ट इथे एक महत्त्वाचा फरक लक्षात ठेवणे आवश्यक आहे. स्टॅम्प पेपर जुना असणे कायदेशीर आहे. पण दस्तऐवजामध्ये जाणीवपूर्वक खोटी तारीख टाकणे, फसवणुकीच्या उद्देशाने बॅक-डेट करणे किंवा बनावट व्यवहार दाखवणे, हे गंभीर गुन्हे ठरू शकतात. अशा वेळी न्यायालय स्टॅम्प पेपरच्या वयाकडे नाही, तर दस्तऐवजाची खरी तारीख, उद्देश, प्रामाणिकपणा आणि फसवणूक झाली आहे का याकडे लक्ष देते.



ॲड.प्रवीण नेहरकर

थोडक्यात निष्कर्ष

non-judicial stamp paper ला कायद्यानुसार expiry date नाही.

Section ५४ मधील ६ महिन्यांची मर्यादा फक्त refund साठी आहे.

जुना स्टॅम्प पेपर वापरल्यामुळे दस्तऐवज आपोआप अवैध ठरत नाही.

पण जर तारीख बनावट, फसवणुकीची किंवा दिशाभूल करणारी असेल, तर तो दस्तऐवज कायदेशीर अडचणीत येऊ शकतो.

संदर्भित महत्त्वाचा निकाल

Thiruvengada Pillai vs. Navaneethammal अपी. (२००८), Supreme Court of India

- Indian Stamp Act A§VJ©V non-judicial stamp paper bm expiry नाही, हे स्पष्ट करणारा ऐतिहासिक निर्णय.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार आरोपीस १० वर्षाची शिक्षा



ॲड.शाम देशपांडे



ॲड.सुहास सुलाखे

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्षाची कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

या घटनेची हकीकत अशी की, आरोपीने फिर्यादी अल्पवयीन आहे हे माहित असतांना देखील तिला लग्नाचे आमिष दाखवून फूस लावून घरातून पळून जाण्यास भाग पाडले व त्यानंतर तिच्या इच्छे विरुद्ध बळजबरीने शारिरीक संबंध ठेवले, अशा आशयाच्या फिर्यादीवरुन पेठ बीड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक पठाण यांनी या प्रकरणाचा तपास केला व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी न्यायमूर्ती पाटवदकर यांच्या न्यायालयासमोर झाली. सदर आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षाकडून ११ साक्षी तपासण्यात आल्या. या प्रकरणात पीडितेचा जबाब वैद्यकीय पुरावा व कागदपत्रे, सरकारी वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीला १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणी सहाय्यक सरकारी वकील सुहास सुलाखे यांनी काम पाहिले, फिर्यादीतर्फे शाम देशपांडे, त्यांचे सहकारी यशवंत मुंडे, सुनील ढाकणे यांनी काम पाहिले.

पान १ वरून

## एमआयएमला १२५ जागा मिळाल्याने जळफळाट

भारतीय जनता पक्षाची बी टीम म्हणून टीका करत हिणवत आहेत. २९ महानगर पालिकांमध्ये बहुतांश ठिकाणी एमआयएमचे उमेदवार हे विजयी झालेले आहेत. जिथे काँग्रेसला खातेही उघडता आले नाही अशा ठिकाणी एमआयएमचा बोलबाला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीवाल्यांनी या निकालावर चिंतन करुन अभ्यास करण्याची गरज आहे.

## फारुक पटेल, मुजीब, आशफात तुम्ही...

तिच्या भावाची, बीड शहरात मोक्याच्या जागेवर प्रॉपर्टी आहे, ज्या प्रॉपर्टीवर बिलाल आणि सनाउल्लाचा डोळा आहे, त्यांना ही प्रॉपर्टी हडप करायची आहे अशी ती महिला व्हीडीओतील मुलाखतीत सांगते. दोन-चार दिवसापुर्वी सदर महिला आपल्या आई आणि बहिणीसोबत कोर्टाची तारीख करुन तहसिलदार शेळके यांना भेटण्यासाठी आली होती. त्या ठिकाणी सनाउल्ला, बिलाल चाऊस जो विजयराजेंचा माणूस आहे ते आले. या अगोदरही यांनी आम्हाला त्रास दिलेला आहे. मी पेठ बीड पोलीस ठाण्यात गेले त्यावेळी त्या ठिकाणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही, १५ जानेवारीला पेठ बीड पोलिसांनी माझे काहीही ऐकून घेतले नाही. फक्त एनसी घेतली. आम्हाला मारहाण होऊन तीन दिवस झाले, अजुन पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला नाही. मी पोलीस अधीक्षकांनाही भेटले, त्यांनी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना संबंधीत अधिकाऱ्यांना दिल्या, मात्र अद्यापही गुन्हा दाखल झालेला नाही. आमच्या जिवाला धोका आहे. माझा भाऊ ज्याच्या नावावर ही संपत्ती आहे तो दुबईमध्ये आहे. तो इकडे येत नाही. या सर्व लोकांना ही प्रॉपर्टी हडप करायची आहे त्यामुळे ते त्रास देत आहेत. समाजातील महिलेला अशा प्रकारे गुंडांकडून मारहाण होत असेल तर फारुक पटेल, मुजीबभाई, आशफाक यांना मी आवाहन करते की तुम्ही अशा गुंडांना सहकार्य करु नका, मला सहकार्य करा असे सदर महिलेने सांगितले आहे.

## माजलगाव शहर पोलिसांची हेल्मेट सक्तीची

आपले हेल्मेट सोबतच ठेवून आपला जीव वाचवण्यासाठी हेल्मेट वापरावे व शासनाचा दंड होणारा दंड टाळावा असे आवाहन शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी केले आहे.ही कार्यवाही पो.नि. राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हे. एस एस शिंदे महादेव कोकणर, अनिल कानडे, राहुल गोरे, अंजूम मॅडम आदि हे करत आहेत.

## आणि नर्स वेळ संपली म्हणून निघून गेली..

केला व कुलूप लावून ती निघून गेली आणि पेशंटच्या नातेवाईकांनी विचारणा केली असता अर्वाच्च भाषेत उत्तर देऊन तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणून पेशंटची सोनोग्राफी न करता सदर नर्स निघून गेली. जिल्हा रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी या प्रकरणी दखल घेऊन सदर नर्सवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## आष्टी तहसिलदार पाटील यांची हुकुमशाही

खच्चीकरण करून हिन दर्जाची वागणूक त्यांच्याकडून मिळत आहे. ग्राममहसूल अधिकारी असो की मंडळ अधिकारी प्रत्येकाला शिपाई दर्जापेक्षा खालची वागणूक दिली जाते.

दि.१६ जानेवारी २०२६ रोजी आष्टीमध्ये ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकारी तालुका कार्यकारणीची निवड होती त्याअनुषंगाने ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी कामकाज करत असतांना येणाऱ्या अडचणी बाबत चर्चा झाली. त्यावरून तहसिलदार वैशाली पाटील यांना प्रचंड राग आला असून त्यामुळे प्रत्येकावर पूर्वग्रहदुषित भावनेने व जाणूनबुजून त्रास देण्याची मानसिकता तहसिलदाराची आम्हाला दिसून येत आहे आणि ते सत्य आहे. माझी कुठे तक्रार करायची करा, कलेक्टरकडे जा अथवा मंत्र्याकडे जा, माझं कोण काही करू शकत नाही. मी सर्व ठिकाणी फिरून आले आहे.मला काही फरक पडत नाही.नौकरी सोडून द्या, नौकरी करण्याच्या लायकीचे तुम्ही नाहीत. तुम्ही जनावरांसारखे आहात अधिकारी यांचा त्रास काय असतो. हे तुम्हाला आता मी दाखवते असे वारंवार बोलून मानसिक त्रास सुरु आहे.त्यामुळे तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांची जोपर्यंत बदली होत नाही तोपर्यंत आम्ही सामुहिक रजा आंदोलन मागे घेणार नाही. तोपर्यंत कोणतेही कामकाज आम्ही करणार नाही असे निवेदन जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी पाटोदा यांना देण्यात आले आहे.

दरम्यान या प्रकरणाविषयी तहसीलदार वैशाली पाटील यांना मोबाईलवर फोन केला होता परंतु त्यांनी फोन घेतला नाही. म्हणून प्रतिक्रिया मिळू शकली नाही. मध्यंतरी वाकी येथे सुरू असलेल्या उपोषणकर्त्यांनाही अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन त्यांनी भाषा वापरून आपमानीत केले होते.त्यांचा तो व्हिडिओ व्हायरल झाला होता.

## १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह

तिकडे सैरा वैरा पळू लागले. व मुलीला कुठेतरी लपवून ठेवले. झड्ख पल्लवी जाधव यांनी मुलीचा घरात व इतरत्र शोध घेतला पण ती मिळून आली नाही. इथे बालविवाह झालाच नाही असा घरातल्या लोकांनी बनाव केला. विवाह झालेला व्यक्ती पळ काढेल तोच त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता इथे काही झालेच नाही किंवा मी तो व्यक्ती नाहीच अस तो दाखवत होता. परंतु झड्ख पल्लवी जाधव यांच्याकडे लग्न झाल्याचा पुरावा असल्याबाबत सांगितले व लग्नाचा फोटो माझ्याकडे आहे असे सांगितले. मग त्याने घाबरून कबुली दिली. सदर व्यक्तीचे नाव कृष्णा उर्फ बबन अनुरुद्र वरबडे वय ३० वर्ष रा. आम्ला ता. गेवराई जि. बीड असे सांगितले. तसेच पिडीत मुलगी ही १४ वर्षाची असून माझ्या मामाची मुलगी आहे असे सांगितले. सुमारे एक तासानंतर मुलीला फौ. पल्लवी जाधव यांच्या समक्ष हजर केले. सदर मुलगी खूप घाबरलेली होती . तिला जवळ घेवून, विश्वासात घेवून तिची विचारपूस केली. व तिचे समुपदेशन केले. त्यांनतर फौ. पल्लवी जाधव यांनी गावचे सरपंच व ग्रामसेवक यांना घटनास्थळी बोलावून घेतले व त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगितली. तसेच त्यांनी तिथे हजर असलेल्या सर्व नातेवाईक मंडळी व गावातील नागरिकांना बालविवाह कायदा व बालविवाहाचे मुलींवर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत माहिती देवून जनजागृतीपर मार्गदर्शन केले. त्यांनंतर सदर पीडित मुलगी व बालविवाह करणारा कृष्णा उर्फ बबन वरबडे तसेच त्याचे आई वडील यांना ताब्यात घेवून, पुढील कारवाई साठी पोस्टे ला हजर केले व मुलीचे आई वडील यांना फोन करून पोस्टे ला हजर राहण्यास सांगितले . ग्रामसेवक यांना बालविवाह झालेबाबत गुन्हा दाखल करण्यास सांगितले. तसेच पोस्टेच्या महिला अंमलदारांना पीडित मुलीला तिच्या आईवडिलांसोबत बालकल्याण समिती समोर हजर करणेबाबत सूचना दिली. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, झड्ख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे , पोशी योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## तुतारी गट आक्रमक...

बीड शहरातील रस्त्यांची कामे त्वरित सुरू करावे, वेळेवर पिण्याचे पाणी द्यावे. शहर स्वच्छतेसाठी विशेष लक्ष द्यावे, खंब्यावरील लाईट सुरळीत करावे, मोमीनपुरा नालेचा पाणी बार्शीनाका चौक मार्गे बिंदूसरा नदित सोडावे, धांडे नगर नर्सरी नाला बलगुजार मधुनच रेल्वे पुलाच्या बाजुने बिंदूसरा नदित सोडावे, अंगणवाड्या किंवा बालवाडया सुरू करावे, मुकाट कुत्रे व इतर जनावरेचा बंदोबस्त करावे, आठवडी बाजारामुळे सुभाषरोड जाम होतो यशवंत उद्यानाचे उत्तर बाजु किंवा संताबाई पुल ते मोंढा पुल रस्त्यावर जागा उपलब्ध करावे, बिंदुसरा नदीचे सुशोभीकरण करावे, गरिबांना प्रधान्य देऊन घरकुले देण्यात यावी तसेच घरकुलाचे थकीत हप्ते लवकरात लवकर देण्यात यावे, खासबाग ते मोमीनपूरा पुलाचे काम त्वरीत सुरु करावे, डाग बंगला शादीखाना दुरूस्त करून चालू करावे, शहरातील शहरातील पाईपलाईन लिकेज दुरुस्ती करण्यात यावी, कचरा घंटागाड्या नियमित करा, मुख्य चौका सह शहरातील कब्रस्तान समशानभूमी मंदिर मस्जिद परिसरात सौर ऊर्जा विद्युत लाईटी बसवावेत अश्या विविध मागण्या बैठकीत केले आहेत, यावेळी गटनेते खुर्शीद आलम यांच्या सह नगरसेवक उल्हास ग्राम साहेब, नगरसेवक अशोक काळे, नगरसेवक शेख अतहर बब्बु, नगरसेवक सुधाकर जाधव, नगरसेवक भारत कांबळे, नगसेवक रंजीत पिंगळे, नगरसेवक मोमीन मोहसीन, नगरसेवक पठाण अफसर, नगरसेवक मसुद खान, नगरसेवक शेख रोहील, नगरसेवक शेख रईस, नगरसेवक मसी मोमीन, नगरसेवक शेख अफसर उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं ११७७/२०२५**

**अंकुश महादेव डोळस –विरुध्द ग्रा.पं. कार्यालय शिवणी**

पहा

१. अंकुश महादेव डोळस, रा. शिवणी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक अंकुश महादेव डोळस यांचा दिनांक ०३/१२/१९६६ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास शिवणी ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे शिवणी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०२/२०२६ ही आहे.

16514-14399

**तहसिलदार, बीड.**


पान ६ वरून

## रुपूरमध्ये बिबट्याचा महिलेवर हल्ला

दबाधरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. बिबट्याने प्रथम पंजाने त्यांच्या मानेवर गालावर आणि हतावर हल्ला चढवला. मात्र, भेदरलेल्या अवस्थेत मणकर्णा नेटके यांनी बिबट्याच्या हल्ल्यास प्रतिकार केला. मणकर्णा नेटके यांच्या प्रतिकारामुळे बिबट्याने घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान, मणकर्णा यांच्या मानेला स्कार्प गुंडाळलेला असल्याने पुढील अनर्थ टळल्याचे वनकर्मचारी यावेळी म्हणाले. हल्ल्याची माहिती मिळताच वनरक्षक एन. के. काकडे, वनमजुर आंबदास लवांडे, सोपान येवले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेवून पायाचे ठशांवर माग काढण्याचा प्रयत्न केला. दराम्यान, पायाच्या ठस्यावरून बिबट्या असल्याच्या निष्कर्ष काढण्यात आला. पाटोदा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी घोडके, वनपाल देवगूडे यांनी घटनास्थळाची पाहाणी करून परिसरात बिबट्याचा काढण्याचा प्रयत्न केला. मणकर्णा नेटके यांना जखमी अवस्थेत शिरूरच्या प्राथमिक आरोग्यकेंद्रात हलवण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

**आधिवास निश्चित करून पिंजरा लावणार:** रुपूर शिवारात महिलेवर बिबट्यानेच हल्ला केल्याचे स्थळपाहाणीवरून सिद्ध झाले आहे. लवकरच परिसरात ट्रॅपकॅमेरे लावून आधिवास निश्चित करण्यात येईल. अधिवास निश्चितीनंतर तात्कळा पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्यत येणार आहे. परिसरातील शेतकरी, महिलांनी एकट्याने शेतात थांबणे टाळावे. शक्यतो गळ्याभोवती जाड मफलर अथवा इतर गरमीचे वस्त्र बांधूनच शेतात जावे. आसपास बिबट्याची चाहूल लागताच वनविभागास संपर्क करावा,असे आमोल घोडके वनपरिक्षेत्र अधिकारी,वनपरिक्षेत्र कार्यालय पाटोदा असे ते म्हणाले.

## बीड जिल्हा परिषद सीईओने केली कारवाई

पटसंख्या २५ वरून सप्टेंबर २०२५ पासून सहावर आली आहे वर्गात निवांतपणे एक शिक्षक खाली तर दुसरे शिक्षक महाशय खुर्चीवर बसल्या जागी झोपा काढत असल्याचा व्हिडिओ मात्र मोठा सर्वत्र व्हायरल झाला आणि तो व्हिडिओ समोर आला होता ग्रामस्थ तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या तक्रारीनंतर शिक्षणाधिकारी डॉ,किरण कुंवर यांनी दखल घेतली तसेच आष्टीचे गटशिक्षण अधिकारी मोहन काकडे यांना केंद्रप्रमुखांना चौकशी आदेश दिले आहेत व नंतर अहवाल वरिष्ठांना पाठवला . दरम्यान केंद्र प्रमुखांच्या अहवालानुसार मन्मथ देवीदास उटकुलवाड हे १२ जानेवारी पासून शाळेत गैरजर असल्याचे हजेरी पटावरून तसेच शालेय पोषण आहार अभिलेखे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. तर १३ जानेवारी रोजी भेटीदरम्यान या शिक्षकांच्या तोंडाला घाणेरडा वास येत होता तर अनिल उदावंत यांनी १३ जानेवारीपासून हजेरीपटावर स्वाक्षरी केली नसल्याचे तसेच १७ रोजी अध्यापनाचे काम न करता झोपल्याचे ते व त्यांच्या तोंडातून उग्र दर्प येत होता असे अहवालात नमूद आहे या कृत्यामुळे दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

## लवूळ येथे आज शिव महापुराण कथेची सांगता

वर्ग मंडळींनी वातावरण गावात निर्माण झाले होते. येथील महिलावर्ग सतत धार्मिक कार्यात अग्रेसर असतात. सर्व समाजातील लोक व महिलावर्ग एकत्रित येऊन या कथेचे सेवन करतात. सहभाग घेऊन एक धार्मिक हा कार्यक्रम अतिशय भव्य आणि दिव्य असा होतो. या कथेसाठी गावातील महिला वर्ग व पुरुष मोठ्या संख्येने सात दिवसाच्या कालावधीत उपस्थित असतात. शिवमहापुराण कथेची सांगता आज दि. २२ जानेवारी गुरुवार या दिवशी होत असून कथेची वेळ १० ते १२ असून त्यानंतर लगेच महाप्रसाद होईल, तरी पंचक्रोशीतील जास्तीत जास्त भाविक मंडळांनी या कथेचे व महाप्रसादाचा लाभ घ्यावा. अशी विनंती लवूळ क्रमांक १ येथील सर्व गावकरी महिला मंडळी यांच्यावतीने करण्यात आलेले आहे.

## डांबर रस्ता व बांध,पाणंद रस्त्यासाठी

निवेदन देण्यात आले आणि ये त्या २३ जानेवारीपासून हे बेमुदत उपोषण होणार असून याची दखल प्रशासनाने तात्काळ घ्यावी असा इशारा उपोषण कर्त्यांनी निवेदनातून देण्यात आला या उपोषणात सर्व शेतकऱ्यांनी, गावकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी, तरुणांनी, कर्मचाऱ्यांनी, सहभागी व्हावे असे आवाहन सादोळा शाखेच्या वतीने करण्यात येत आहे.

## लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर

माराव्या लागत होत्या म्हणून शेतकरी रावसाहेब नावडकर यांचे चिरंजीव युवा शेतकरी संघर्ष समितीचे सदस्य तुकाराम नावडकर यांनी प्रशासनाचे व कारखान्याचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक २१ जानेवारी रोजी लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या मुख्य गेटवर दिवसभर अर्ध नग्न आंदोलन केले आहे रात्री उशिरा प्रशासना कारखान्याच्या प्रशासनाच्या वतीने दोन-तीन दिवसात उसगाव पास निवासी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

## आशिष शर्मा यांना मातृशोक

जानेवारी रोजी रात्री सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी दुःखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थिवावर दिनांक २० जानेवारी रोजी सकाळी राजस्थानी वैकुंठ धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात मुलगा आशिष शर्मा ,सुन पाच मुली नातवंडे असा परिवार आहे शर्मा परिवाराच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## आज श्रीक्षेत्र कपिलधार येथे शिवदीक्षा संस्कार कार्यक्रम

व अविस्मरणीय झाली. संत शिरोमणी श्री मन्मथस्वामींचा ४६८ वा जन्मोत्सव माघ शुद्ध वसंत पंचमीनिमित्त दिनांक १६ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ पर्यंत अखंड शिवनाम सप्ताह, भजन, प्रवचन, किर्तन, परम रहस्य पारायण, धर्मसभा, पदयात्रा, शिवदीक्षा संस्कार, कुंभस्नान व महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यासह आंध्रप्रदेश, कर्नाटक पंचक्रोषीतील भाविकभक्त सहभाग नोंदवून नामचिंतन पवित्र कुंभस्नान, ज्ञानयज्ञ, भक्तीच्या मार्गात समरस होऊन जातात.

शिवदीक्षा संस्कार ; नाव नोंदणीसाठी संपर्क साधावा

वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी शिवदीक्षा संस्कारात सहभाग नोंदविण्यासाठी मल्लिकार्जुन आग्रे मो.क्र.९४०४३१८९२०, महादेव स्वामी मो.क्र.९९२२४२४०२९ , विजयकुमार मुसळे मो.क्र.९४२२७४४७४४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

## मयुरीताई बांगर यांची निवड

उपाध्यक्ष तथा भाजपा बीड जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील, नवनियुक्त नगरसेवक अँड गोविंद शिराळे बीड नं. प., माजी नगरसेवक बाबुराव परळकर,बीड जिल्हा संघटक संजय कुलकर्णी, बीड जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी च्या तक्षशिला सोनवणे,राजू अडागळे आदीच्या उपास्तीत निवड जाहीर करण्यात अली आहे.

## जयदत्त धस यांची पाटोदा तालुक्यात

भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.धार्मिक कार्यक्रम तसेच दुःखद प्रसंगी उपस्थित राहून नागरिकांशी संपर्क राखणे ही आपली जबाबदारी असल्याचे जयदत्त धस यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या या उपस्थितीमुळे संबंधित ठिकाणी उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## महिलांच्या पंढरीत हरिनामाचा गजर

संस्थानाचा लक्षणीय विकास झाला असून, दरवर्षी हा पुण्यतिथी सोहळा संपूर्ण राज्यातून भाविकांना आकर्षित करणारा महत्त्वाचा धार्मिक उत्सव ठरला आहे.

या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, राज्यातील नामवंत कीर्तनकार या ठिकाणी आपली कीर्तनसेवा अर्पण करणार आहेत. शनिवार दिनांक २४ जानेवारी रोजी ह.भ.प. मेहबूब महाराज शास्त्री यांच्या कीर्तनसेवेने सप्ताहाची सुरुवात होणार असून, रविवार दिनांक २५ जानेवारी रोजी ह.भ.प. रोहिणीताई महाराज परांजपे यांचे कीर्तन होणार आहे. सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सचिन महाराज पवार, मंगळवार दिनांक २७ जानेवारी रोजी ह.भ.प. अतुल महाराज शास्त्री, बुधवार दिनांक २८ जानेवारी रोजी विशाल महाराज खोले, गुरुवार दिनांक २९ जानेवारी रोजी अमृताश्रम स्वामी महाराज आणि शुक्रवार दिनांक ३० जानेवारी रोजी जगन्नाथ महाराज पाटील यांच्या कीर्तनसेवेने हरिनाम सप्ताह अधिक रंगणार आहे.

सोहळ्याच्या सांगतेप्रसंगी शनिवार दिनांक ३१ जानेवारी रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत संस्थानाच्या मठाधिपती महंत राधाताई महाराज आईसाहेब यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, हा क्षण भाविकांसाठी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे. या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वाल्मिकी रामायण कथा. रामायणाचार्य महामंडलेश्वर स्वामी जयानंद सरस्वती यांच्या सुश्राव्य वाणीतून दररोज दुपारी वाल्मिकी रामकथेचे कथन होणार असून, या कथेतून भक्ती, संस्कार आणि जीवनमूल्यांचा संदेश दिला जाणार आहे.या पुण्यतिथी सोहळ्यात अध्यात्मासोबत सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली आहे. संस्थानच्या वतीने महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महंत राधाताई महाराज आईसाहेब यांनी केले आहे.या भव्य पुण्यतिथी सोहळ्याच्या सांगतेप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, श्रीक्षेत्र संत मीराबाई आईसाहेब संस्थान, महासांगवी तसेच परिसरातील ग्रामस्थांनी भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## पाटोदा प्रीमियर लीग पर्व–७ साठी आ.सुरेश धस यांना निमंत्रण

कालावधीत आयोजित या स्पर्धेला यंदा अधिक भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे.या भेटीदरम्यान पाटोदा प्रीमियर लीग पर्व–७ च्या संपूर्ण आयोजनाची माहिती देण्यात आली. स्पर्धेची रचना, संघांची निवड, खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग तसेच या माध्यमातून युवकांसाठी उपलब्ध होणाऱ्या संधी यावर सविस्तर चर्चा झाली. याचवेळी पाटोदा शहरातील क्रिकेटपटूंना त्यांच्या हक्काचे, सुसज्ज व आधुनिक सुविधांनी युक्त कायमस्वरूपी क्रीडांगण उपलब्ध करून देण्याची ठाम मागणी पाटोदा स्पोर्ट्स क्लबच्या वतीने आमदार सुरेश धस यांच्याकडे करण्यात आली.

यंदाच्या पाटोदा प्रीमियर लीग पर्व–७ मध्ये एकूण आठ संघ सहभागी होत असून, संघर्ष ११, शौर्य ११, एस.डी. वॉरियर्स, शिवक्रांती योद्धा, जी.बी. चॅलेंजर्स, मयूर क्रिकेट क्लब, अण्णा वॉरियर्स आणि जे.डी. बॉईज या संघांमध्ये चुरशीचे सामने रंगणार आहेत. या स्पर्धेमुळे स्थानिक खेळाडूंना आपले क्रिकेट कौशल्य मोठ्या व्यासपीठावर सादर करण्याची संधी मिळणार असून अनेक उदयोन्मुख खेळाडूंना नवी ओळख मिळणार आहे.

दिनांक २६ जानेवारीपासून क्रिकेटच्या महासंग्रामास प्रारंभ होणार असून, पारगाव रोडवरील मैदान यासाठी भव्य पद्धतीने सज्ज करण्यात आले आहे. खेळाडूंसह क्रिकेटप्रेमींकरिता आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही पाटोदा प्रीमियर लीगला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पाटोदा प्रीमियर लीग ही स्पर्धा क्रिकेटप्रेमींसाठी खऱ्या अर्थाने मेजवानी ठरणार आहे. या निमंत्रणावेळी आयोजक नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, युवा नेते गणेश काका भोसले, प्रा. लक्ष्मण वाघमारे यांच्यासह पाटोदा स्पोर्ट्स क्लब कमिटीचे पदाधिकारी जय जाधव, संजय गीते, शुभम जाधव, राहुल खोटे, तौफिक सर, अविनाश आर्सुल, सोमनाथ मंडलिक, आदर्श सनप, वैभव सनप, महेश खोटे तसेच इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाटोदा शहरातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करणे, युवकांना सकारात्मक दिशा देणे आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा पाटोदा प्रीमियर लीग पर्व–७ चा मुख्य उद्देश असून, ही स्पर्धा पाटोद्याच्या क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.

AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २२ जानेवारी २०२६ पान -३


### भक्तराज कदम यांचे दुख:द निधनाने आनंदगावात हळहळ



केज दि (प्रतिनिधी) केज तालुक्यातील आनंदगाव येथील जेष्ठ नागरिक, सेवानिवृत्त कृषी सहाय्यक भक्तराज मोहन कदम वय ७० वर्ष यांचे सोमवार रोजी दि.१९ जानेवारी २०२६ सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कदमवस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना दोन मुले, मुलगी, सून नातवंडे असा परिवार आहे. ते उद्योजक रवी कदम यांचे वडील होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### जीवाचीवाडी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा

केज दि २१ (प्रतिनिधी) - केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथुन १ ९ जानेवारी रोजी प्रथमच जीवाचीवाडी ते पंढरपुर पायी दिंडी सोहळ्याचा प्रारंभ झाला तसे या दिंडीला निरोप देण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुखपाहुणे म्हणुन माजी आमदार केशवरावदादा आंधळे होते यावेळी त्यांनी नमूद केले की, यावर्षी प्रथमच जीवाची वाडी ते पंढरपुर पायी दिंडी सोहळा सुरू होत आहे. मनुष्याने परमार्थ केला तर खरोखरच सुख आणि समाधान मिळते. स्वातंत्र्य सैनिक कै. भगवान काळे यांच्या आत्म्यास खरोखरच शांती लाभेल असे धार्मिक उल्लेखनीय कार्य त्यांचे तिन्ही चिरंजीव पद्माकर, आण्णासाहेब व नामदेव यांनी केले आहे. यावेळी ह.भ.प.जालींदर महाराज नेहरकर यांच्या किर्तनाचे आयोजन केलेले असुन या सुवर्ण संधीचा भावीकांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. काळे कुटूंब व ग्रामस्थांनी माजी आमदार केशवरावदादा आंधळे यांचा हृदय सत्कार करून त्यांचे आभार मानले.

## मारहाणीचा गुन्हा सिद्ध झाल्यावरून कोर्टाने ठोकली रणजीत शेळकेला विविध कलमाखाली शिक्षा

बीड दि २१(प्रतिनिधी) - बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याच्या खटल्यामध्ये मारहाण करून शिवीगाळ केल्याचा गुना सिद्ध झाल्याने अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या कोर्टाने रंजित जिजावा शेळके याला भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४. ३२५ अन्वये दोषी धरुन शिक्षा सुनावली. तर कलम ३२५ भा.द.वी. अंतर्गत एक वर्षाचा तुरुंगवासाची शिक्षा आणि ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षेची सजा तसेच कलम ३२४ भा.द.वि. अंतर्गत दोषी धरुन दोन महिन तुरुंगवासाची शिक्षा आणि १ हजार दंड, दंड न भरल्यास एक महिन्याचा तुरुंगवासाची शिक्षा आणि कलम ३२३ भा.द.वि अंतर्गत दोषी धरुन एक महिन्याचा तुरुंगवास आणि ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवसांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्याचा तपास नुकतेच फौजदार झालेले व त्यावेळी एएसआय म्हणून असताना जयसिंग नरसिंग वाघ यांनी केला होता. या खटल्याची माहिती अशी की तालुक्यातील समनापुर येथील फिर्यादी जनार्धन उद्धव गोरे यांनी ३१ मे २० १९ रोजी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्याकडे फिर्याद दिली की, त्यांची विधवा बहीण संगीता रमेश शेळके व भाचा तुषार रमेश शेळके दोघे रा. समनापुर येथे राहतात, दिनांक २७ मे २०१९ रोजी फिर्यादी जनार्धन यांना आरोपी रंजित जीजाबा शेळके यांनी फोन करुन बहिणीच्या वस्ती जवळ लवकर येण्यास सांगितले, फिर्यादी त्यांच्या बहीणीच्या घरा जवळ गेला असता रंजित जीजीबा शेळके हा फिर्यादीची बहिण संगीता हीस शिवीगाळ करत होता व भाचा तुषार यास दंडगाने मारहान करत होता. त्यामुळे फिर्यादीने त्यांच्या बहिणीला सतत का त्रास देत असतात तेव्हा लक्ष्मण जिजाबा शेळके याने रंजित जिजाबा शेळके यास भडकावून दिले व फिर्यादीच्या उजव्या हाताच्या दंडावर चावा घेतला व डोक्यात दंगड मारुन जखमी केले व पुन्हा उजव्या पायावर दंगड मारला त्यामुळे फिर्यादीचा पाय फ्रैक्चर झाला. यात फिर्यादीला पायावर शस्त्रक्रीया करावी लागली. सदर फिर्यादीवरुन बीड ग्रामीण पोलीस स्टेशन यांनी गुन्ह्याचा तपास करुन तपासी अंमलदार जयसिंग नरसिंग वाघ , यांनी आरोपी लक्ष्मण जिजाबा शेळके व रंजित जिजाबा शेळके यांच्या विरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर प्रकरणात सरकारीपक्षाने फिर्यादीसह १० साक्षीदारांची साक्ष नोंदवून आरोपी विरुद्ध भक्कम पुराव्यानिशी प्रकरण चालवले. न्यायाधीश के.सी.माने अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी बीड यांनी दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती राठोड व त्यांना सहाय्यक वकील एस. एस. शिंदे यांच्या युक्तीवादावरुन आरोपी रंजित जीजाबा शेळके याला भा.द.वि. ३२३, ३२४, ३२५ अंतर्गत तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली.

## हप्ते खोरीच्या जमान्यात अख्ख चिंचोली माळी गाव बेवडे होण्याची ज्येष्ठ नागरिकांना भिती

चिंचोली माळी दि २१ (प्रतिनिधी)- केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे नागबेट वस्ती ते चिंचोली माळी फाटा येथे धाब्यावर सर्रास बेकायदेशीर दारु विक्री खुले आम सुरू असताना बिट अंमलदार याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. गावांमध्ये बेवड्यांची संख्या वरचे वर वाढत आहे. हप्ते खोरीच्या जमान्यात गावची तरुण मंडळी वाम मार्गाने चालली असल्याने एस पी साहेब चिंचोली गाव तुमच्या डिपार्टमेंटला तळीराम करून टाकायचा आहे काय? असा सवाल सुज्ञ ग्रामस्थांमधून उपस्थित केला जाऊ लागला आहे

केज तालुक्यातील चिंचोली माळी गाव असे गाव आहे की या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम राबवले जातात. या गावात संत नामदेव महाराज होऊन गेले. भक्तिमय मार्गाने चालणाऱ्या या गावांला मात्र हफ्तेखोरीचा शाप लागला की काय? असे वाटू लागले आहे. पूर्वी याच गावामध्ये सात ते आठ हजार लोकसंख्येमध्ये दोन ते तीन दारू प्राषण करणारे व्यक्ती होते. परंतु आज मात्र दारू पिणाऱ्या तरुणांची संख्या एवढी वाढली आहे की काही वर्षांनी हे गाव अख्ख बेवडे होत की काय? याचे चिंता सुज्ञ नगरिकांना वाटू लागली आहे . गावामध्ये कधी नव्हे ते मटका, जुगार खुले आम सुरू असताना केज पोलीस ठाण्याचे याकडे तर लक्ष नाहीच. परंतु बीट अंमलदार देखील आपल्या बीडमध्ये काय चालत आहे. हे बघायला सुद्धा येत नाहीत. नागबेट वस्तीवर खुले आम दारु विक्री होते तरी सुद्धा कारवाई का होत नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान गावातील अवैध धंद्या संदर्भात कोणी विरोध केला तर आमचं काहीच होत नाही. धंदे चालवण्यासाठी गंडे द्यावे लागतात असे छाती ठोकपणे मटका चालवणारे आणि बेकायदेशीर दारू विक्री करणारे बोलताना दिसतात. तेव्हा एस पी साहेब चिंचोली माळीला हप्ते खोरीच्या शापातून उत्पत्ती झालेल्या अवैध धंद्यांना आवर घालण्यासाठी आपल्या यंत्रणेला आपले अस्त्र वापरायचे सांगा. अन्यथा चिंचोली माळी गाव काही वर्षांनी अख्ख बेवड झाल्याशिवाय राहणार नाही याची चिंता सुज्ञ ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

## बीड जिल्ह्याच्या इतिहासावरील परीक्षेस प्रचंड प्रतिसाद

बीड दि २१ (प्रतिनिधी)- भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने बीड जिल्हा इतिहास परिषदेच्या वतीने बीड जिल्ह्याच्या इतिहासावर गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची या पुस्तकावर आधारित प्रज्ञाशोध परीक्षेला बीड परिसरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये बीडच्या इतिहासाची मोठी आवड असल्याचे सिद्ध झाले. दरम्यान पालक विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह पाहता व शाळांच्या विनंती मुळे प्रवेश घेण्याची अंतिम तारीख २४ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे. माजी प्राचार्य जे. एम. पैठणे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा इतिहास परिषदेचे कार्यकर्ते सर्वश्री मंगेश रोटे, अण्णासाहेब गडदे व परिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश साळुंके यांनी चौसाळा, येळमघाट, नेकनुर, लिंबागणेश सह विविध शाळांना भेटी देऊन परीक्षेचे महत्त्व शिक्षक पालक विद्यार्थी व नागरिकांना सांगितले. परीक्षेत बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सदर पुस्तके विनामूल्य वितरित करण्यात येत आहेत. सदर पुस्तकांनी बीडचा इतिहास घरोघरी वाचला जात असून बीड शहरातील चंपावती विद्यालय, शिवाजी विद्यालय, भगवान विद्यालय, संस्कार विद्यालय, कै.द.बा. घुमरे पब्लिक स्कूल, राजर्षी शाहू विद्यालय, कै. जा ।हेर पाटील विद्यालय, नामलगाव, आदर्श विद्यालय, जिल्हा परिषद प्रशाला चौसाळा, राजस्थानी विद्यालय,तसेच लिंबागणेश, ग्रामीण कन्या विद्यालय नेकनूर, कै. बळवंतराव कदम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येळमघाट, जिल्हा परिषद हायस्कूल पोथरा, जिल्हा परिषद हायस्कूल पाचेगाव, जिल्हा परिषद प्रशाला आर्वी, ज्ञानसाधना जीनियस स्कूल वडवणी आदि शाळेतील शेकडो विद्यार्थी परीक्षेत सहभागी झाले आहेत. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित जिल्ह्याच्या इतिहासावरील परीक्षेमुळे नव्या पिढीला इतिहास करण्यात फार मोठी मदत होणार आहे नागरिकांत कडून बीड जिल्हा इतिहास परिषदेचे अभिनंदन होत आहे.

## साठे चौक व बीड बसस्थानका समोर दुतर्फा रिक्षा,दुचाकी उभ्या केल्याने वाहतूक कोंडी

### दोनशे मीटरच्या आत खाजगी वाहनास बंदी असताना वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याची मात्र बघ्याची भूमिका

बीड दि २१ (प्रतिनिधी)- बीड शहरातील जालना रोड, सागर हॉटेल समोर तसेच बीड बस बस स्थानकासमोर अस्ताव्यस्त अवैधरित्या मोटर सायकली व रिक्षा उभ्या केल्या जात असल्याने मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. बस स्थानकाजवळ २०० मीटरच्या खाजगी वाहनास बंदी असताना वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या बघ्याच्या भूमिकेमुळे या आदेशाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येत असून यामुळे मात्र नागरिक हैराण झाले आहेत.

बस स्थानासमोर,साठे चकात तर ठीकठिकाणी रिक्षामुळे वाहतुक कोंडी पाहायला मिळते. वाहतूक कर्मचारी ही बघायची भूमिका घेत आहेत बस स्थानका समोर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांसाठी पॉईंट दिला असताना नियुक्त पोलीस कर्मचारी मात्र चौकी आणि हॉटेल मधून बुड सोडायला तयार नसल्याचे दिसते. बस स्थानकाच्या इन व आऊट गेटच्या समोर पूर्व बाजूला अवैधरीत्या रिक्षा उभ्या केल्या जात असल्याने बस चालकाला गाडी वळवताना भर रस्त्यात थांबवण्याची वेळ येते तरीही चौकीत बसलेला पोलीस बाहेर यायला तयार नसतो.साठे चौकात तर अवैध रिक्षाचा चौक म्हणून ओळखलला जात आहे. गेवराई पाडळसिंगी अवैध प्रवासी वाहतूक करणारे रिक्षे चौकाच्या बाजूसच थांबवले जात असल्याने सतत ट्राफिक जाम होते. ज्या वेळात चौकात वाहतूक पोलीस नियुक्त असतात त्यांचे लक्ष वाहतूक कोंडीऐवजी चक्क मोबाईल मध्ये गुंतल्याचे दिसून येते याच चौकात सभास रोडवर ऑटो रिक्षा थांबविल्या जात असताना वाहतूक पोलीस बोलायला तयार नाहीत नव्हे तर ते पोलिससमोरच रस्त्यावरच आपले रिक्षे थांबवतात. याशिवाय मंडी कॉर्नर,माळी वेस, शिवराज चौक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतुळ्याच्या बाजूला,बार्शी नाका तसेच सर्वच चौकात अवैध रिक्षा,वाहतुकीमुळे कोंडी होत आहे.

.सध्या परीक्षा चालू असल्यामुळे विध्यार्थी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.जालना रोडला बरेच खाजगी रुग्णालय आहेत,सोनोग्राफी सेंटर आहेत त्यामुळे शासकीय रुग्णालयातुन जालना रोडवरील रुग्णालयात जाताना वाहतुक कोंडीचा सामना ऍम्ब्युलन्स पण करावा लागतो.त्यामुळे वाहतूक पोलीस निरिक्षकानी बस स्थानक, भाजी मंडी,बशीर गंज चौकात व राजूरवेस ला पण कर्मचारी नेमणूक करावी अशी मागणी होत आहे.सुभाष रोड ते मंडी जाणारा रस्त्यावर अर्धा अर्धा तास वाहतूक कोडी असते.वाहतूक निरीक्षकानी शहरातील मुख्य चौकात (साठे चौक सागर हॉटेल,शिवराज चौक,डॉ.आंबेडकर पुतळा,बार्शी नाका चौक,माळवेस भागात ऐक पोलीस कर्मचाऱ्याची नेमणूक करून विध्यार्थी व नागरिकांना होणारा त्रासापासून व वाहतुक कोंडीतुन मुक्त करावे अशी मागणी नागरिकांतुन होत आहे.

## श्याम विद्यालयात हळदी कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न



बीड दि २१ (प्रतिनिधी) -केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील शाम विद्यालय, श्याम कनिष्ठ महा विद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात प्राचार्या सौ. जयश्री शरद गदळे यांच्या नेतृत्वाखाली हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी अनेक महिलांनी गीतगायन, अभंग, गवळणी गायन केले आणि कार्यक्रमात रस उत्पत्ती केली. यावेळी परिसरातील महिला भगिनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती सुनंदा कुलकर्णी, श्रीमती इंदुमती ठोंबरे, श्रीमती मनीषा कदम व श्रीमती धनश्री मेहत्रे सह शाम विद्यालय शाम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले अशी माहिती प्रसार माध्यमांना मा. सरपंच तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली आहे.

## ग्रामीण भागातील नर्सेस चे प्रश्न सोडविण्याचे अधिकाऱ्यांनी दिले आश्वासन-राधा जाधव

बीड दि २१(प्रतिनिधी)- - जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व आरोग्य विभागातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये सहाय्यक प्रशासन अधिकारी दयानंद .एस सरपते व जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी सचिन शेकडे यांनी मार्गदर्शन तर केलीच परंतु यावेळी बोलताना नर्सेस चे सर्व प्रश्न सोडवण्याचे व त्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी तथा प्रशासन अधिकारी डॉ . रौफ सर यांनी दिले. नर्सेस संघटनेच्या वतीने बोलताना बीड जिल्ह्यातील आरोग्य सेविकतेचे कंबरडे मोडले तरी शासनाला आरोग्य सेवेचा कणा मात्र ताठ पाहिजे असा सवाल राधा जाधव यांनी केला.अप्पर आयुक्त आस्थापना



छत्रपती संभाजी नगर यांच्या सूचनेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होणारी बैठक विभाग प्रमुख तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी घ्यावी अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्यानुसार सदरील बैठक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर उल्हास गंडाळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सदरील कामकाजासाठी सर्व कनिष्ठ प्रशासन अधिकारी व आस्थापना यांनी सहकार्य केले संघटनेच्या वतीने संघटनेच्या पदाधिकारी म्हणून श्रीमती लोखंडे, श्रीमती पाटोळे सिस्टर, श्रीमती आत्राम सिस्टर, श्रीमती बनकर सिस्टर, श्रीमती पवार सिस्टर, श्रीमती वैशाली मिसाळ, कार्याध्यक्ष श्रीमती पडलवार सिस्टर सरचिटणीस श्रीमती बहिरवाल उपस्थित होत्या, संघटनेच्या सचिव या नात्याने श्रीमती विद्या घुगे यांनी वरिष्ठांकडे प्रश्न मांडले व संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती राधा जाधव यांनी सर्व बीड जिल्हा ग्रामी.ण नर्सेस संघटनेच्या वतीने नरसीचे प्रश्न मांडले.

## जैन कॉन्फरन्स व कोठारी प्रतिष्ठांचा आनंद धाम फाउंडेशनला या अन्नदाता भूषण पुरस्कार प्रधान



जामखेड दि २१(प्रतिनिधी)- केवळ दहा रुपयात पोटभर जेवण देण्याचे कार्य गेली दहा वर्षापासून अहिल्या नगर येथील आनंद धाम फाउंडेशन करीत आहे . या संस्थेला जैन कॉन्फरन्स व कोठारी प्रतिष्ठानचा आनंद धाम फाउंडेशन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ रोजी चंदूकाका जेल्स्? चे संचालक आनंद कांतीलाल कोठारी यांच्या शुभहस्ते देण्यात आला असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी नमूद केले. यावेळी न्यायाधीश विक्रम आव्हाड, जामखेडच्या नगराध्यक्ष सौ प्रांजल अमित चिंतामणी, कोठारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय कोठारी, विजय भोरकडे यांच्या शुभहस्ते अन्नदाता भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेसदर पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी आणि मिठूलाल नवलाखा यांनी जाहीर केला होता .या संस्थेचे अध्यक्ष मा.अभय लुनिया, राजेंद्र चोपडा, राहुल सोनीमंडलेचा, आनंद चोपडा ,अनिल दुगड ,नितीन शिंगवी ,भास्करराव पवार रितेश सोनीमंडलेचा, प्रीतम गांधी, निलेश पोखरणा ,सुनील चोरबोले , प्रवीण मनोत, राजू गांधी ,चेतन मुथीयान , डॉ.सचिन बोरा, संतोष बनबेरू हे सर्वजण मिळून हे काम करत आहेत त्यांच्या या कार्याबद्दल हार्दिक अभिनंदन देखील करण्यात आले.

## इयत्ता नववी वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या

### आईने खेळायला जाऊ दिले नाही म्हणून स्वत:ला संपवले



केज, दि. २१(प्रतिनिधी)- शहरातील समर्थ नगर गल्ली नंबर ३ मध्ये राहणाऱ्या प्रत्येक रामेश्वर डोईफोडे या १५ वर्षे वयाच्या इयत्ता नववी ब मधील विद्यार्थ्यांने आपल्या घरातच मातापित्याचे बेडरूम मध्ये जाऊन गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रकार रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उघडकीस आला. या घटनेने मात्र सर्वत्र खळबळ उडाली आहे आईने खेळावयास जाण्यास मज्जाव केल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान प्रतीक डोईफोडे हा शहरातील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेचा विद्यार्थी असून याच शाळेची इयत्ता नववीत शिकणारी तांबवा येथील विद्यार्थिनी तनुजा गोविंद चाटे हिने देखील २८ डिसेंबर रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली होती. या दोन्ही घटनेचा माघोबा घेऊन पालक वर्गांनी चिंता व्यक्त केली असून विद्यार्थ्यांना कोणत्याही बाबतीत राग अनावर होत असल्याने हे टोकाचे पाऊल उचलले जात असल्याचे मत व्यक्त केले जाऊ लागले आहे.यासंदर्भात समोर आलेली माहिती अशी की, रविवारी दि. १८ सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान प्रतीक डोईफोडे याचा एक मित्र घरी आला त्याने प्रतीकला खेळायला चल म्हणुन आग्रह चालवला, मात्र प्रतीकच्या आईने त्याला मित्रा सोबत खेळायला जाऊ दिले नाही. आता उन्ह आहे चार वाजण्याच्या नंतर खेळायला जा म्हणुन मित्रासमोर आईने सांगितल्याचा प्रतीकला राग आला. लागलीस तो आई, वडिलांच्या बेडरूम गेला . त्याने बेडरूमची आतून दार लावून घेवून घरातील पंख्याला गळफास घेवून आत्महत्या केली. आई स्वयंपाक घरात कामात व्यस्त राहिल्या मुळे त्यांनी प्रतीक थांबलेल्या बेडरूमकडे लक्ष दिले नव्हते. दुपारीं दिड वाजण्याच्या दरम्यान सर्व काम आटोपल्या नंतर आई बेडरूम कडे गेली आसता आतून दार लावल्याचे आईच्या निदर्शनास आले. त्यांनी प्रतीकला हाका मारल्या परंतु आतमधून कसलाच प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी आरडा, ओरडा केल्यानंतर शेजाऱ्यांनी दार तोडून आत पाहिले आसता प्रतीक हा गळ्यात दोरी अडकवलेल्या अवस्थेत जमिनीवर कोसळलेल्या अवस्थेत तो दिसून आला. तातडीने त्याला केज येथील उपजिल्हा रुग्णालयात हडलविले आसता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला अंबाजोगाई येथील स्वाराती ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविले. मात्र रस्त्यातच त्याची प्राण ज्योत मालवली.एस आर टी अंबाजोगाई येथे उत्तरीय तपासनी केल्या नंतर पार्थिव नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. रविवारी रात्री साडे दहा वाजता क्रांती नगर समशान भूमीत प्रतीक डोईफोडे याच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्य संस्कार करण्यात आले . या घटनेने पालक वर्गामध्ये मात्र चिंता व्यक्त केली जाऊ लागली आहे. तर याच स्वामी विवेकानंद विद्यामंदिर विद्यालयाच्या इयत्ता नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या तनुजा गोविंद चाटे या १४ वर्षे वयाच्या तालुक्यातील तांबवा येथील रहिवासी असलेल्या विद्यार्थिनीने २८ डिसेंबर रोजी राहत्या घरातील पंख्याला साडीने गळफास घेवून आत्महत्या केली होती.ही घटना ताजी असतानाच पुन्हा ९ विच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याने पालक व शिक्षक वर्गात खळबळ उडाली आहे. आज-काल आई-वडिलांनी कितीही समजूतदारपणे सांगितले तरी मुलांना हे सांगणे मनाविरुद्ध वाटते यामुळे कित्येक मुलं घरात तनतन करतात तर काहीजण अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलत असल्याने पालक वर्ग मात्र चिंता व्यक्त करू लागला असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## भूमी अभिलेख कार्यालयाचे काम अन सहा महिने थांब ;६-६ महिने पीआर कॉर्ड तयार होत नाहीत

बीड दि २१(प्रतिनिधी)- बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असून देखील बीड भूमी अभिलेख कार्यालयात गेल्या ६ महिन्यापासून उपअधीक्षक पद रिक्त असल्याने तात्पुरत्या चार्ज देण्यात आला तशी अनेकांची कामे रखडली जात आहेत. भूमि अभिलेख कार्यालयातील पीआर कार्ड सह इतर कामे होण्यास विलंब होत आहे.त्यामुळे प्लॉट,जमीन सदर खरेदी विक्री केलेल्या नागरिकांना याचा नाहक त्रास होत असून या कार्यालयातील तात्काळ रिक्त पदे भरन्यात यावीत अशी मागणी नागरिक करत आहेत.

भूमी अभिलेख कार्यालयातील पदाचा अतिरिक्त पदभार सध्या हा उपअधीक्षक अनिल शिवणकर यांच्या कडे असुन सदरील अधिकारी आल्यापासून सामन्य जनतेची प्रचंड हेळसांड होत आहे एका फेरफार प्रकरणासाठी किमान सहा महिन्या चा कालावधी लागत आहे, सदरची कामे करण्यास त्या अधिकाऱ्यास वेळ



नाही, निवडणुकीची कामे असल्याचे कारण सांगत कामे करण्यासाठी कार्यालयातील कामे करण्यासाठी कार्यालयातील कामे करण्यास टाळाटाळ होत आहे.अतिरिक्त कारभार असल्याने यांना आठवड्यातून दोन वेळेस कार्यालयात येणे बंधनकारक असून देखील हे विविध कारणे सांगून बीडला येत नसल्यान अनेक फेरफार प्रकरण फाईल धूळखात पडल्या आहेत. फेरफार व पिआर कार्ड सह इतर कामासाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना चकरा माराव्या लागत असून काही ठराविक भूमाफियाचे काम तात्काळ होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे. यामुळे या कार्यालयात आर्थिक देवाणघेवाण देखील होण्याची शक्यता नाकारता येणार नाही भूमी अभिलेख कार्यालयावर वचक राहिला नसल्याने इतर कर्मचारी देखील कामे करण्यास उदासीन असल्याचे दिसत आहेत यामुळे इतर कामे हे प्रलंबित पडले आहेत. भूमिअभिलेख कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना ताटकळत थांबावे लागत आहे.यांच्या कडील पदभार काढून कायमस्वरूपी अधिकारी द्यावा व भूमी अभिलेख कार्यालयातील दांडी मारणाऱ्या व कामात काय करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिक मागणी करत आहेत.

## संपादकीय

### आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस

स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांची उद्या म्हणजे २३ जानेवारी रोजी जयंती आहे. २३ जानेवारी १८८७ रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. नेताजी लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. पण त्यांना गुरू दर्शन झाले नाही म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे साहित्य वाचून त्यांना गुरू बनवले. कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेंव्हा नेताजींनी उभे राहून त्या शिक्षकाला जाब विचारीत निषेध नोंदवला. इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या नोकरीवर पाणी सोडले. तेंव्हा गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. असहकार चळवळ समजून घेण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधींनी त्यांना चित्तरंजन दास यांच्याकडे पाठवले. चित्तरंजन दास हे त्यांचे राजकीय गुरू बनले. इंग्लंडची राणी कोलकोत्याच्या दौऱ्यावर येणार आहे हे समजल्यावर नेताजींनी या दौऱ्यावर बहिष्कार टाकण्याची योजना आखली. इंग्रजांना त्याची कुणकुण लागताच त्यांनी नेताजी आणि चित्तरंजन दास यांना अटक केली. सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करुन तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकोत्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्ष ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य काँग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्याग्रहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली. या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. बर्लिनमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराच्या साहाय्याने भारतावर आक्रमण केले. दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान निकोबार बेटे जिंकली. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेनेच्या फौजा भारताकडे निघाल्या मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. महायुद्धात जर्मनी, इटली यांचा पराभव झाला. जपानने शरणागती पत्करली तेंव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या विमानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# बालविवाह कुटुंब व्यवस्था उध्वस्त करणारी अनिष्ट प्रथा - प्रा.डॉ.सय्यद शहानुर

पाटोदा दि २१(प्रतिनिधी)-येथील वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तालुक्यातील मौजे चुंबळी येथे युवा व शाश्वत विकास विशेष लक्ष पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास या उपक्रमानुसार राष्ट्रीय सेवा योजना सात सुरू आहे. या शिबिराच्या सहाव्या दिवसाच्या बौद्धिक सत्रामध्ये लिंगभाव व बालविवाह समस्या या विषयावरील कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथील शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. डॉ. शहानुर सय्यद यांचे व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्यक्रम अधिकारी प्रा. गोकुळ कंठाळे



अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ लांडगे यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी विद्यार्थ्यांच्या श्रमाविषयी आणि वनराई बंधाऱ्याच्या नव निर्मिती विषयी पाहुण्यांना माहिती करून दिली. त्या नंतर डॉ. सय्यद शहानुर यांनी आपल्या व्याख्यानात त्यांनी, बालविवाह समस्या ही आपल्या संस्कृतीला लागलेली कीड आहे, यामुळे कुटुंबाचा विकास तर दूरच उलट कुटुंबाची अधोगती होण्यास या रुढी परंपरा कारणीभूत ठरतात, लिंगभेदामुळे स्त्री आणि पुरुष असा भेदभाव होऊन स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते, यामुळे कुटुंब व्यवस्थेत भावनिक दरी निर्माण होते म्हणून हा भेदभाव करू नये आणि कुटुंब व्यवस्था विस्कळीत होऊ नये याची आपण काळजी घेतली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप मध्ये प्रा. गोकुळ कंठाळे यांनी केला, या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विनोद उगले, तर प्राध्यापक चंद्रकांत बनसोडे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रदीप मांजरे प्रा. डॉ. जालिंदर लोणके आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

### राज्याध्यक्षपदी डॉ.राजेश इंगोले तर उपाध्यक्षपदी डॉ.पल्लवी दोडके

## इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्राची सांस्कृतिक समितीची राज्य कार्यकारणी जाहीर

अंबाजोगाई दि.२१(प्रतिनिधी)- इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीच्या राज्य अध्यक्षपदावर अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले तर उपाध्यक्षपदी परभणीच्या डॉ.पल्लवी दोडके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी सचिव डॉ.विक्रांत देसाई यांनी सदरील निवडीचे पत्र संबंधितांना राज्य मध्यवर्ती कार्यालया तर्फे पाठवले आहे. दमदार कामगिरीमुळे सलग चौथ्या वर्षी डॉ.राजेश



इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे डॉ.इंगोले यांच्या सलग ४ वेळा नियुक्तीमुळे अंबाजोगाई शहराचे नांव महाराष्ट्रातील कोनाकोपऱ्या तील डॉक्टरांना माहित झाल्याचे, तसेच अंबाजोगाईचा नांवलौकिक सर्व दूर पसरवण्याचे काम डॉ.राजेश इंगोले यांनी केले आहे असे मत इंडियन मेडिकल असोसिएशन च्या अंबाजोगाई शाखेच्या सर्व डॉक्टरांनी व्यक्त करुन त्यांचे अभिनंदन करून भरभरून शुभेच्छा दिल्या.

## धारूर येथील पंचमुखी गणेश मंदिरात गणेश जयंतीनिमित्त आज महाप्रसाद

किल्ले धारूर दि २१( प्रतिनिधी )-धारूर शहरातील कसबा विभागात असलेल्या पंचमुखी गणेश मंदिरात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भक्तिभावात लाडक्या बाप्पाची गणेश जयंती साजरी होणार आहे.

नवसाला पावणारा गणपती अशी भाविकांमध्ये ओळख असलेल्या या पंचमुखी गणेश मंदिरात प्रत्येक चतुर्थीला मोठ्या संख्येने गणेश भक्त दर्शनासाठी उपस्थित राहत असतात. याच भक्तिभावाच्या परंपरेनुसार गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी गणेश जयंतीनिमित्त विशेष पूजा, अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी सकाळपासून सायंकाळपर्यंत भाविकांसाठी दर्शन खुले राहणार असून महाप्रसादाचे वाटप



करण्यात येणार आहे.या पावन प्रसंगी सर्व गणेश भक्तांनी पंचमुखी गणेश मंदिर, देशपांडे गल्ली, कसबा विभाग येथे सहकुटुंब - सहपरिवार उपस्थित राहून लाडक्या बाप्पाचे दर्शन घ्यावे व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे सस्नेह निमंत्रण मंदिर समिती व पंचमुखी गणेश भक्त मंडळाच्या वतीने देण्यात आले आहे.

## सहशिक्षक अशोक मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

किल्ले धारूर दि २१(प्रतिनिधी)-धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जहागीर मोहा येथील सहशिक्षक अशोक नारायण मुंडे यांचा वाढदिवस शाळेतील २२० विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य वाटप करून साजरा करण्यात आला. सहशिक्षक अशोक मुंडे यांचा मुलगा विजय मुंडे यांनी आई-वडिलांनी दिलेल्या खाऊच्या पैशांची जुळवाजुळ करून तब्बल ५२०० रुपयांची शैक्षणिक साहित्याची खरेदी केली. व आपल्या वडिलांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. यावेळी धारूर पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रकाश



कोकाटे, सरपंच अविनाश कांदे, शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगत कोकाटे, उपाध्यक्ष कृष्णा बिल्पे व समितीतील इतर सदस्य यांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयात संत तुकाराम महाराज जयंती साजरी

बीड दि २१(प्रतिनिधी )- येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने संत तुकाराम महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी मोरे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून इंग्रजी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार नवसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते इतिहास विभागाचे डॉ. बाबासाहेब जावळे होते.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ.महादेव जगताप यांनी केले. संत तुकाराम महाराजांच्या आम्हा घरी शब्दांचीच रत्ने या अभंगाचा संदर्भ देत त्यांनी शब्दांची ताकद, भाषेची शुद्धता आणि समाजातील वाईट चालीरीतींविरुद्ध कठोर शब्दप्रयोगाचे महत्त्व विशद केले.प्रमुख वक्ते डॉ.बाबासाहेब जावळे यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून समाजाला मिळालेल्या विचारांची देणगी अधोरेखित केली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांनी सांगितले की, साधुसंतांचे कार्य कोणत्याही जाती-धर्मापुरते मर्यादित नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी होते. तुकाराम महाराजांची गाथा जरी बुडवली गेली असली, तरी त्यांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देत आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मराठी विभागाचे डॉ.राजीव काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.नितीन चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अमोल गाडेकर यांना लोकरत्न पुरस्कार देऊन केले सन्मानित

बीड दि २१(प्रतिनिधी)- अंबड तालुक्यातील जामखेड या सर्कल मध्ये कार्यरत असणारे सहायक कृषी अधिकारी अमोल गाडेकर यांच्या आतापर्यंतच्या कार्याची दखल घेऊन त्यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

अमोल गाडेकर यांची कृतव्य दक्ष अधिकारी म्हूणन त्यांची ओळख आहे. ते शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर जाऊन सरकारी योजनाची माहिती देऊन लाभ मिळवून देण्यात ते अव्वल आहेत. ते स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांना काय हवे आहे. त्यांच्या समस्या काय आहेत. याची जाणीव असल्याने ते त्यांच्या फार्मर आय डी सह अनेक योजना गावा गावात माहिती सांगून



त्यांना लाभ मिळवून देत आहेत. एवढेच नाही तर ते शेतकऱ्यांच्या समस्या सोडवितात. या त्यांच्या कार्याची दाखल घेऊन अमोल भिकनराव गाडेकर यांना महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या व श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तथा सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या आदेशावरून हा लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

## जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपातून अशफाक पठाण याची निर्दोष मुक्तता

माजलगाव दि २१ (प्रतिनिधी)- गवळणबाई बाळासाहेब दळवी ह्या ४ जानेवारी २० २० रोजी रात्री साडेआठच्या सुमारास राशन दुकानात राशन आणण्यासाठी गेले असता अशफाक याने कमरेचा बेल्ट व लाथा बुक्क्याने व जातीवाचक शिवीगाळ करून परत तुला जीव मारून टाकू अशी धमकी दिली. अशा आशयाच्या तक्रारीवरून दाखल झालेल्या गुन्ह्याच्या निकालात न्यायालयाने अश्फाक पठाण यांचे निर्दोष मुक्तता केली.

याबाबत असे की गवळणबाई बालासाहेब दळवी यांनी ५ जानेवारी २०२० रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली त्यानुसार सादर आरोपी विरुद्ध गु. र . न.०७/२०२० कलम ३२३,३२४,५०४ भा. द.वी व कलम ३( १) (ठ) (ड),३ (२)(रिं) अ.जा.ज.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल केला नंतर तपासणी अंमलदार यांनी प्रकरणात तपास पूर्ण करून मा.अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे दोषारोप दाखल केले नंतर सरकार पक्षाच्या वतीने सहा साक्षीदार तपासण्यात आले नंतर दोन्ही पक्षाच्यावतीने अंतिम युक्तिवाद होऊन मा.राजेश्री पी.परदेशी,अतिरिक्त सत्र न्यायाधीश माजलगाव यांनी दि.०७ जानेवारी२०२६ रोजी निकाल जाहीर करून आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आरोपीच्या वतीने माजलगाव येथील जेष्ठ विधीज्ञ अॅड.व्ही.बी.लवटे व अॅड.एल बी गवते यांनी काम पाहिले त्यांना अॅड.एस.डी.लंगे अॅड.व्ही.एन जुजगर, अॅड.सी.आर.गवते यांनी सहकार्य केले

## जिल्हा सैनिक कार्यालयाकडून माजी सैनिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष-वाघमारे

बीड दि २१(प्रतिनिधी) :-माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्यासाठी स्थापन करण्यात आलेले बीड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय आपली जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी केला आहे. कार्यालयाने शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांना बगल देत काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने पिडीत माजी सैनिकांवर अन्याय केल्याचा दावा त्यांनी केला.वाघमारे यांनी सांगितले की, माजी सैनिकांच्या तक्रारी सोडवण्याऐवजी त्यांचीच पडताळणी व अडवणूक केली जाते. अमृत जवान सन्मान योजना वेळेत राबवण्यातही दुर्लक्ष करण्यात आले असून, याबाबत तक्रारी करूनही कार्यवाही झालेली नाही. तसेच, असंवैधानिक समित्या स्थापन करून काही माजी सैनिकांना मोहरा बनवत अन्यायकारक कारवाया केल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. गेल्या अनेक वर्षांपासून पोलिसां कडून ही आपल्यावर अन्याय होत असून, या संदर्भात न्यायालय, मानवाधिकार आयोग व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्याचे त्यांनी स्पष्ट



केले. माजी सैनिकांना न्याय न मिळाल्यास आंदोलन व कायदेशीर मार्ग अवलंबण्याचा इशारा वाघमारे यांनी दिला आहे.

## अमोल शेरकर यांना साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे वैचारिक वारसदार पुरस्कार जाहीर

माजलगाव दि २१ (प्रतिनिधी) - मातंग समाजाला आंबेडकर चळवळीची जाणीव करून देणारा संघर्ष योद्धा अमोल शेरकर यांना साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे वैचारिक वारसदार पुरस्कार जाहीर करण्यात येणार आहे.सत्यशोधक बहुजन आघाडी व ज्योतिबा सावित्री फाउंडेशन यांच्या विद्यमानातून आंबेडकरवादी मातंग परिषद यांच्या वतीने हा पुरस्कार सोहळा पुणे येथे आयोजित केला आहे.या सोहळ्याचे आयोजन दि. २५ जानेवारी रोजी ठीक १२.वाजता साने गुरुजी स्मारक राष्ट्रसेवा दल पुणे या ठिकाणी होणार आहे. अमोल शेरकर यांनी वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवला आणि चळवळीला साजेसे योगदान दिले. समाजाला आंबेडकरी प्रवाहा मध्ये आणण्यासाठी अमोल सरकर यांनी गेल्या १३ वर्षापासून विविध कार्यक्रमा द्वारे नेहमीच प्रयत्न केले आहेत. महापुरुषाच्या जयंतीनिमित्त विविध व्याख्यानमाला व विविध




कार्यक्रम आयोजित करत असतात. तसेच समाजाच्या विविध सामाजिक राजकीय प्रश्नावर आग्रही भूमिका घेऊन समाजाला न्याय मिळवून देण्यास सतत अग्रेसर असणार नेतृत्व आहे अशी प्रतिमा तयार झाल्याने या कामाची पावती म्हणून हा बहुमान पुणे या सारख्या ठिकाणच्या सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या आंबेडकरवादी मातंग परिषद यांनी आयोजित केला आहे.

### स्वातंत्र सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात प्रादेशिक उपायुक्त यांची भेट

बीड दि.२१(प्रतिनिधी):- २० जानेवारी रोजी स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय येथे भारत सरकार शिष्यवृत्ती लेखा परीक्षण अनुषंघाने आवश्यक ती कागदपत्रे तपासणी पथक प्रमुख एम टी डहाळे सहाय्यक संचालक ( वित्त व लेखा )प्रभारी प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगर यांनी भेट देऊन लेखापरीक्षण केले व महाविद्यालयातील शिष्यवृत्ती संदर्भातील कागदपत्राची तपासणी केली असता ,अद्ययावत लेखे दस्तावेज ठेवल्याबद्दल त्यांनी महाविद्यालयाची स्तुती व अभिनंदन करून समाधान व्यक्त केले ,त्या समयी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान यांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले ,त्यावेळी महाविद्यालयात भोहरा तसेच महाविद्यालयाचे शिष्यवृत्ती विभागाचे पी.एम मुळीक सर व सहकारी कर्मचारी उपस्थित होते.

## इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाडमध्ये किशोरी इंग्लिश स्कूलला तीन गोल्ड मेडल


बीड दि २१(प्रतिनिधी)- किशोरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड (खचज) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका वाजवला आहे. नोव्हेंबर महिन्यात पार पडलेल्या या प्रतिष्ठित परीक्षेत शाळेतील एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे किशोरी इंग्लिश स्कूलचा शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून तब्बल



ANAY KALYANI ADITYA SARDA
92.50% PERCENTAGE



RAGHAV SANDHYA SACHIN KHARDEKAR
85.00% PERCENTAGE



ANIKA POOJA DEEPAK BHALLA
89.70% PERCENTAGE

३ विद्यार्थ्यांनी या परिक्षेत गोल्ड मेडल पटकावले आहे. इयत्ता पहिलीतील अनय कल्याणी आदित्य सारडा या विद्यार्थाने ९२.५० टक्के गुण मिळवत आंतरराष्ट्रीय स्तरावर १५ वा तसेच झोनल स्तरावर १५ वा क्रमांक पटकावला असून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान मिळवला आहे. इयत्ता पहिलीतीलच राघव संध्या सचिन खर्डेकर याने ८५ टक्के गुणांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर ११४ वा आणि झोनल स्तरावर १०१ वा क्रमांक मिळवत शाळेतून द्वितीय क्रमांक पटकावला आहे.इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी अनिका पूजा दीपक भल्ला हिने ८९.७० टक्के गुण मिळवत आंतरराष्ट्रीय स्तरावर ७५० वा आणि झोनल स्तरावर ५५० वा क्रमांक पटकावला असून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या यशात मानाचा वाटा उचलला आहे. या यशाबद्दल शाळेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेच्या प्राचार्या मेघा बिर्ला तसेच गणित विषयाच्या शिक्षिका काजल मालपाणी यांच्या मार्गदर्शन व मेहनतीचे विशेष कौतुक करण्यात आले.या घवघवीत यशामुळे किशोरी इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी अशाच प्रकारे उत्कृष्ट यश संपादन करतील, याची आम्हाला खात्री आहे.असे किशोरी इंग्लिश स्कूलच्या संच आली का डॉ. अदिती सारडा यांनी नमूद केले.

# चौसाळा परिसरातील खेळाडूंनी देश पातळीवर नावलौकिक मिळवावा-डॉ.योगेश क्षीरसागर



चौसाळा दि २१ (प्रतिनिधी) : ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये गुणवत्ता आहे. चौसाळा महाविद्यालय प्रीमियर लीग च्या माध्यमातून खेळाडूंना योग्य अशी संधी मिळाली आहे त्यामुळे खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी असे प्रतिपादन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित चौसाळा कॉलेज प्रीमियर लीग ( सी. सी. पी. एल.) टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पंचायत समितीचे माजी सभापती श्री काकासाहेब जोगदंड, श्री अच्युत रसाळ, श्री महादेव खोसे, श्री भूषण झोडगे,श्री रमेश कळाशे, श्री वैभव मोटे, श्री रवींद्र मच्छिंद्रे, श्री अशोक शिंदे, उपसरपंच अंकुशराव कळाशे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर म्हणाले की, चौसाळा महाविद्यालयाने आयोजित केलेली ही स्पर्धा ग्रामीण भागातील खेळाडूंसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे यातूनच देश पातळीवर लौकिक मिळवणारे खेळाडू निर्माण होतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे म्हणाले की, चौसाळा परिसरात खेळाचे वातावरण निर्माण होण्यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.तर आभार प्रदर्शन प्राध्यापक विलास भिलारे यांनी व्यक्त केले ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. सय्यद शहानुर प्रा. डॉ. सुधाकर वनवे प्रा. गणपती ढवळशंक प्रा. डॉ. कुशाबा साळुंखे प्रा. डॉ. प्रशांत साबळे प्रा. सुधीर तेलप प्रा. विकास शिंदे प्रा. ओम चाळक यांनी परिश्रम केले यावेळी मोठ्या संख्येने नागरिक खेळाडू व विद्यार्थी उपस्थित होते.

# ए.एच.वाडिया सार्वजनिक वाचनालयाचा वर्धापन दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त डॉ.गणेश कुटे यांची मुलाखत



बीड दि २१(प्रतिनिधी)- शहरातील अत्यंत जुने व जवळपास ७८ हजार ग्रंथ संपदा असलेल्या ए. एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाचा ६२ वा वर्धापन दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीदिनी म्हणजेच दि. २३ जानेवारी २०२६ रोजी वाडिया वाचन कट्टा या सदरात डॉ. गणेश कुटे यांची प्रकट मुलाखत होणार आहे.

त्याअनुषंगाने ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाचा वर्धापनदिन शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सायं. ५.०० ते ६.०० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात साजरा होणार आहे. सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या फोटो प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते केले जाईल व त्यानंतर वाडिया वाचन कट्टा या सदरात हास्यालॉजी या विनोदी पुस्तकाचे लेखक डॉ. गणेश कुटे यांची प्रकट मुलाखत होणार असल्याची माहिती कार्यकारी मंडळाचे सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांनी दिली.सदरील कार्यक्रमासंदर्भात अधिक माहिती देतांना कार्यकारी मंडळाचे सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांनी सांगीतले की, डॉ. गणेश कुटे हे बीड शहरातील असल्यामुळे व त्यांचे पहिले पुस्तक हास्यालॉजी नुकतेच प्रकाशित झाले आहे. यासंदर्भात आपण त्यांच्याशी या पुस्तकासंदर्भात त्याची प्रकट मुलाखत आयोजीत केली आहे. सदर मुलाखत ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर हे घेणार आहेत. सदरील कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श अमोलकचंद सुराणा, उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सदस्य ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी शहरातील प्रतिष्ठीत व्यक्ती, वकील, डॉक्टर्स, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार, वाचक, सभासद यांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ए. एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या विश्वस्त मंडळ व कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने ॲड.गोविंद शिराळे यांचा भव्य सत्कार

बीड (प्रतिनिधी): महाराष्ट्रात लौकिक असलेल्या बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने नगरपरिषद बीड येथे स्वीकृत सदस्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल ॲड. गोविंद शिराळे यांचा भव्यदिव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सदर नियुक्ती ही कायदेविषयक पार्श्वभूमी, विधी विद्यापीठातून प्राप्त पदवी तसेच दहा वर्षे सहा महिन्यांच्या प्रदीर्घ वकिली अनुभवाच्या आधारे तसेच गेली तेरा वर्षे भाजपाच्या सक्रिय सदस्य म्हणून तसेच गेल्या वीस वर्षापासून वडीलांच्या खांद्याला खांदा देवून सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक क्षेत्रामध्ये काम केल्यामुळे भाजपच्या पक्ष नेतृत्वाने आदरणीय आमच्या नेत्या नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब, भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ देशमुख, माझे सर्वस्व दैवत माझे आदरणीय वडील भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ (अण्णा)शिराळे, बीड विधानसभा युवा नेते डॉ.योगेशभैय्या क्षीरसागर, बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राज्य कार्यकारिणी सदस्य ॲड.सर्जेराव (तात्या) तांदळे, बीड शहर अध्यक्ष अशोक लोढा, नागरगोजे सर यांनी संधी दिल्याबद्दल हा क्षण ॲड. गोविंद शिराळे यांच्यासाठी अत्यंत अभिमानाचा व कौतुकाचा ठरला.

यावेळी बोलताना ॲड. गोविंद शिराळे यांनी सांगितले की, मी एक चांगला वकील व सक्षम अभिवक्ता म्हणून घडण्यासाठी माझ्या प्रॅक्टीस सुरुवात पुणे जिल्हा व सत्र न्यायालय व बीड जिल्हा वकील संघातील सर्व ज्येष्ठ वकील, सहकारी, सीनियर व ज्युनियर वकिलांचे मार्गदर्शन, त्यांचे अमूल्य सल्ले व सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले आहे.

# गढी जि.प.शाळेतील आनंदीनगरी बाजारात विद्यार्थ्यांनी दाखवली उद्योजकतेची झलक



गेवराई दि.२१ (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील मौजे गढी येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आलेला आनंदनगरी बाजार उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी विक्रीस ठेवलेल्या वस्तूतून मोठी उलाढाल झाली.

गढी येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये आनंदीनगरी बाजार भरविण्यात आला होता. या उपक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच विष्णूपंत घोंगडे, माजी सरपंच अंकुशराव गायकवाड, चंद्रशेखर गवळी, जालिंदर उगलमुगले, माजी उपसरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंगेश कांबळे, फौजी दिलीप नाकाडे, सामाजिक कार्यकर्ते रामदास मुंढे, ग्रामपंचायत सदस्य अमोल ससाणे, अशोक मोटे, निपाणी जवळका केंद्रातील केंद्रप्रमुख अण्णासाहेब लोणकर, आदर्श शिक्षक ठाकूर सर, संजय वसंत शिरसाठ, भीमराव म्हेत्रे, जि.प.शाळा गढी येथील मुख्याध्यापिका सुरेखा वडमारे, कुलकर्णी ज्योती, शेख नुसरत बेगम, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष रवी शिरसाठ आदीजण उपस्थित होते. यावेळीआदर्श शिक्षक ठाकूर संजय सरपंच विष्णूपंत घोंगडे यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याची वाहवा केली. यावेळी माता पालकांची रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये महिलांनी पारंपारिक पद्धतीने हळदी-कुंकू लावून वान देण्यात आला. मुलांच्या गुणवत्तेमध्ये महिलांचे महत्त्व याविषयी शाळेतील शिक्षकांनी महिला पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सुरेखा वडमारे, संजय ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. या आनंदीनगरीला आठवडी बाजाराचे स्वरूप आले होते.

# आमच्याकडे काहीच नाही; सगळं कागदावरच!

## जिल्हा परिषद शाळेतील चिमुकलीने थेट अजित पवारांना लिहिलं हृदयद्रावक पत्र



बीड दि २१(प्रतिनिधी)-बीड जिल्ह्यातील परभणी केसापुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या अंकिता कवचट या चिमुकल्या विद्यार्थिनीने थेट राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांना लिहिलेलं पत्र सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. शाळेतील मूलभूत सुविधांचा अभाव, कागदोपत्री खर्च आणि प्रत्यक्ष वास्तव यातील तफावत तिने अतिशय धाडसाने या पत्रातून मांडली आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलभुत असुविधा आणि शाळेच्या दुरावस्था याविषयी वारंवार आंदोलने करून पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष वेधले आहे.आता या चिमुकल्या मुलीचा आर्त टाहो दादा ऐकतील काय? आणि बीड जिल्ह्यातील शाळेची दुरावस्था संपुष्टात येईल का हा खरा प्रश्न आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली असून प्रशासनासमोर गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

अंकिताने आपल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे,शाळेत स्वच्छ पिण्याचे पाणी नाही, स्वच्छतागृहांची दुरवस्था आहे, वर्ग खोल्यांमध्ये बसण्याची योग्य सोय नाही, खेळाचे साहित्य, शैक्षणिक साधने उपलब्ध नाहीत.कागदावर मात्र पाणी फिल्टर, खेळाचे साहित्य, प्रोजेक्टर आदींसाठी लाखो रुपयांचा खर्च दाखवण्यात आल्याचा आरोप तिने केला आहे. प्रत्यक्षात मात्र विद्यार्थ्यांना काहीच मिळालेलं नाही, असं तिचं म्हणणं आहे. पत्रात अंकिताने भावनिक शब्दांत म्हटलं आहे की,आम्ही काय आयुष्यभर ऊसतोड मजूरच बनायचं का?

आम्हालाही डॉक्टर, शिक्षक, अधिकारी व्हायचं आहे. पण शाळेतच सोय नसेल तर पुढे कसं जायचं? शिक्षकज्व र्गाबद्दल तिने कृतज्ञता व्यक्त करताना, शिक्षक चांगले आहेत, पण व्यवस्थाच अपयशी ठरत असल्याचं स्पष्ट केलं आहे.

एका लहानशा विद्यार्थिनीने धैर्याने थेट उपमुख्यमंत्र्यांपर्यंत आपली व्यथा पोहोचवणे हे कौतुकास्पद असले, तरी या पत्रामुळे ग्रामीण शाळांमधील कथित भ्रष्टाचार, दुर्लक्ष आणि प्रशासनाची उदासीनता उघड झाली आहे.आता खरा प्रश्न हा आहे की - पालकमंत्री अजितदादा पवार या 'लाडक्या बहिणीच्या लाडक्या भाचीला' न्याय देतील का? आणि परभणी केसापुरीच्या चिमुकल्यांचं भविष्य बदलणार का? असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींच्या संघाला राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक



माजलगाव दि २१ (प्रतिनिधी) : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व लातूर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १८ जानेवारी उदगीर येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ १९ वर्ष वयोगटातून राज्यात तृतीय आला आहे.

या स्पर्धेमध्ये छ. संभाजीनगर विभागाचा पहिला सामना नागपूर विभागाशी झाला, अगदी सरळ २-० ने हा सामना जिंकून सेमीफायनल चा सामना कोल्हापूर च्या संघाशी चूर्षीचा २-१ असा झाला, व तृतीय क्रमांकाचा सामना लातूर विभागाशी झाला लातूर विभागाला सहज पराभव करून २-० ने विजय मिळवून, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा संघ कांस्य पदकाचा मानकरी ठरला.

या संघामध्ये सहभागी खेळाडू कर्णधार वैष्णवी कोरडे, आदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, गौरी गायकवाड या मुलींचा सहभाग होता,विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश भाऊ चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्निल टाक , प्रा. संजय बागुल, प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. इम्रान पठाण प्रा. डॉ. एकनाथ शेंडगे यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९(१) नुसार सुधारित अधिसुचना

**क्र.९२/एलएनक्यू/एसआर-१**
**उपविभागीय अधिकारी, माजलगाव**
**दिनांक .०१.२०२५**

ज्याअर्थी, समोचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भूमि संपादन, पुनर्वसन च पुर्नवसाहत करताना उचित भरपाइ मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापूढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम-११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदर करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंगिक आधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की यासोबत जोडलेल्या अनुसुचि-१ मध्ये अधिक तपशिलवार वर्ण केलेल्या जमीनीचा, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचे कलम-१५ च्या पोट कलम-२ अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याचाबत्त खात्री पटली आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलग-१९ पोटकलम-१ च्या तरतुदी अन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसूची-३ मध्ये अधिक तपशिल वर्णन केलेले क्षेत्र हे वाधिक कुटूंबीयांच्या पूनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुर्नवसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोपित केले असून पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसूची-४ मध्ये विनिर्दोष्ठ केले आहे.

आणि ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये सनोचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याचे कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी माजलगांव यास पदनिर्देशित करत आहे.

### परिशिष्ट १

जमिनीचे वर्णन

गावाचे नांव : **सुरनरवाडी, तालुका धारुर जि.बीड.**

| अ.क्र. | गट नं./सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| | **मौजे सुरनरवाडी** | |
| १. | ४२/१६३ | ०.५४ |
| २. | ४३/१६४ | ०.४५ |
| | **मौजे पिंपरवाडा** | **१.१६** |
| ३. | ११४/३२१ | ०.४४ |
| ४. | ११५/३२२ | ०.१८ |
| ५. | ११६/३२३ | १.०८ |
| | **एकुण** | **२.६९** |

### अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबावत विवरण

**प्रकल्पाचे नाव:** पाझर तलाव मौजे सुरनरवाडी ता. धारूर जि. बीड

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन:** पाझर तलाव

**सामाजिक फायदे:** शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी इतर सार्वजनिक हितार्थ

### अनुसूची-तीन

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**गावाचे नांव : सुरनरवाडी, ता.धारूर जिल्हा: बीड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| लागू नाही. | | |

### अनुसूची-चार

(पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाय निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२ नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे. टिप: उक्त जमीनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी माजलगांव याच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : .०१.२०२५

ठिकाण : माजलगाव

**उपविभागीय अधिकारी**
**माजलगाव**

जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/१९१

## टि.सी.मार्कमेमो हरवला आहे

**तुकाराम श्रावण केंद्रे**
रा. सोन्नाथडी ता.माजलगाव जि.बीड या नावाचा १० वी पासचा टी.सी. व मार्क मेमो माजलगाव ते सोन्नाथडी बस प्रवासात हरवला आहे.तरी कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा
संपर्क: ९३७०२ ५९३५१

## जाहीर प्रगटन

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

कुसूम व इतर विरुध्द निरंक (मार्फत : ॲड.शैलजा.एम.गर्जे)
कि. दि. अर्ज नंबर ०९/२०२६

अर्जदार : **१. कुसूम छ. आधु सोनवणे,** वय १८ वर्षे, धंदा घरकाम,
**२. रुपा पि. आनु सोनवणे,** वय ३९ वर्षे, धंदा गरकाम,
**अर्जदार** क्र. ९ व २ रा. बहाली, ता. पाटीदा, जि. बीड.
ह.मु. नाणेकर स्टोअर्सजवळ, आदर्श नगर, रुम नं. ६७, पिंपरी, पुणे शहर, पुणे.

**विरूध्द - निरंक**

**मागणी अर्ज:** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार क्र १ व २ यांनी या न्यायालयात मयत आनु पि. माणिक सोनवणे यांचे बारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **आश्रु पि. माणिक सोनवणे** यांचा मृत्यु दिनांक ०६/०६/२०२५ रोजी आदर्श नगर, पिंपरी, पिंपरी चिंचवड, हवेली जि. पुणे येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ही मयताची मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **आश्रु पि. माणिक सोनवणे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची

**पुढील तारीख दि.१८ फेब्रुवारी २०२६.**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, पाटोदा

क.लिपीक

## जाहिर प्रगटन

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार **दत्ता नवनाथ पवार**, रा. तेली गल्ली, पेठ बीड, ता. जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून व अधिकृत केल्यावरुन मी सर्वांच्या माहिती करिता हे जाहीर प्रगटन देत आहे की, मोहम्मद समीर मोहम्मद अख्तर, रा. मोमीनपुरा, बीड, ता.जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील बीड तरफ खोड येथील नगर परिषद हद्दिचे आतील गट नं. २२/अ मधील प्लॉट क्र. ७८, ७९, ८० ज्याची साईज पुर्व पश्चिम ६० फुट व दक्षिण उत्तर ४० फुट आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ २४०० चौ. फुट आहे. ज्याची चतुः सिमा पुर्वेस : ३० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ७७, दक्षिणेस : २० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस : राम लक्ष्मण पवार यांची जमीन आहे.

उपरोक्त वर्णनाचा प्लॉट मालकाने माझे पक्षकार यांना असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट हा पुर्णपणे निर्विवाद, र्निजोखीम, कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही अथवा प्रलंबीत नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉट संपादित झालेला नाही अथवा तशी नोटीस प्लॉट धारकास आलेली नाही. व सदर प्लॉट हा कोणत्याही स्थानिक संस्थेने रिजर्व्ह केलेला नाही. तसेच प्लॉट मालकाने माझे पक्षकारास आणखी असा विश्वास दिला आहे की, त्यांनी माझे पक्षकारा शिवाय ईतरां सोबत सदर प्लॉटच्या संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. द्वारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. तसेच सदर प्लॉट त्यांचे शिवाय त्यांचे वालीवारस व इतरांच्या कोणताही हक्क संबंध नाही तरी माझे पक्षकार याद्वारे सर्वांना सूचित करतात की, वरील जमीन खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार, गहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन दिल्या पासून ०८ दिवसाचे आत संपूर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह लेखी स्वरुपात नोंदवावीत अन्यथा व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व मुदती नंतर कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत :
**ॲड. एन.पी. होळकर, बीड.**
रा.श्रीयोग दत्त नगर,
के.एस. के.कॉलेज रोड, बीड.

जाहीर प्रगटन देणार मार्फत
**दत्ता नवनाथ पवार**
रा. तेली गल्ली, पेठ बीड, ता.जि. बीड
मो.नं. ९९६०७६४०६४

## आशिष शर्मा यांना मातृशोक



माजलगाव दि.२१( प्रतिनिधी):- माजलगाव येथील एचडीएफसी बँकेतील सहायक मॅनेजर आशिष शर्मा यांच्या मातोश्री श्रीमती शकुंतला सत्यनारायण शर्मा व ७५ वर्ष यांचे दिनांक १९ जानेवारी रोजी दुखद निधन झाले आहे. शकुंतला सत्यनारायण शर्मा या अत्यंत मनमिळावू धार्मिक आणि प्रेमळ स्वभावाच्या होत्या त्यांचे वृद्ध काळाने दिनांक १९ पान २ वर

# पार्श्वभूमी

## मयुरीताई बांगर यांची निवड

बीड दि.२१(प्रतिनिधी):-येथील सामाजिक कार्यकर्त्या मयुरीताई बांगर यांची लोकशाही पत्रकार संघाच्या राजकारण विकास समिती च्या प्रदेश अध्यक्ष पदी निवड जाहीर करण्यात अली आहे. ही निवड राष्ट्रीय अध्यक्ष बीबी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव,राष्ट्रीय उपाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंखे पाटील, प्रदेश सचिव गणेश जगदाळे,प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, सहसचिव सुनील महाकुंडे, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, अनिस कुरेशी, साजेद सय्यद, श्रद्धा कंडूडे, प्रदेश उपाध्यक्ष, युवा प्रदेश अध्यक्ष किशोर पवार,शुभांगी पाटील यांच्या आदेशानुसार प्रदेश पान २ वर



# बीडमधील पोलीस पाटील भरती आजपासून सुरू

बीड दि.२१(प्रतिनिधी)-अनेक वर्षापासून रिक्त असलेल्या आणि तांत्रिक कारणामुळे रखडलेल्या पोलीस पाटील भरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन या भरती प्रक्रियेचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले,येत्या २२ फेब्रुवारी रोजी लेखी परीक्षा होणार आहे.

१९ जानेवारी रोजी उपविभागीय दंडाधिकारी बीड तथा पोलीस पाटील पदभरती प्रक्रिया समितीच्या अध्यक्षा कविता जाधव यांनी सविस्तर जाहिरात अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यात आली आहे. बीड मधील पोलीस पाटील भरतीला सुरुवात झाली आहे. भरती प्रक्रिया राबवताना महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ आणि संबंधित निर्णयांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश बीड पाटोदा माजलगाव अंबाजोगाई पहिली या पाचही उपविभागी उपविभागातील उपविभागीय दंडाळीकांना देण्यात आले आहेत उपविभाग स्तरावरून अर्जाची छाटणी लेखी परीक्षा आणि मुलाखती पार पडतील लेखी परीक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच तोंडी परीक्षा घेतली जाणार आहे. भरतीचे सविस्तर वेळापत्रक वेळ पुढीलप्रमाणे १९ जानेवारी जाहिरात प्रसिद्धी व प्रवेश प्रक्रिया सुरू ३० जानेवारी अर्ज करण्याची शेवटची मुदत,२ ते ६ फेब्रुवारी अर्जाची छाननी व प्रवेशपत्र वाटप, २२ फेब्रुवारी लेखी परीक्षा, २४ फेब्रुवारी लेखी परीक्षेचा निकाल, २५ ते २८ फेब्रुवारी तोंडी परीक्षा, २ मार्च अंतिम निवड यादी तथा निकाल इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधून आपला अर्ज दिनांक ३० जानेवारी पर्यंत भरावा असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

## महिलेच्या प्रसंगावधानमुळे अनर्थ टळला ; जखमी महिलेवर शिरुरच्या आरोग्य केंद्रात उपचार,प्रकृती स्थिर

# रुपूरमध्ये बिबट्याचा महिलेवर हल्ला

शिरुर कासार, दि.२१(प्रतिनिधी): तालुक्यातील रुपूर शिवारात शेतात कापुस वेचणार्या महिलेवर बिबट्याने हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यात महिलेच्या गळ्यावर, चेहऱ्यावर आणि हाताला जबर जखमा झाल्या. हल्ल्याची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळावर दाखल झाले जखमी महिलेवर शिरुरच्या प्रथमिक आरोग्य



### प्रसंगावधानामुळे पुढील अनर्थ टळला

**कापुस वेचत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचनाक हल्ला चढवला. भेदरलेल्या अवस्थेत रात्तबंबाळ होवूनही मणकर्णा यांनी बिबट्याचा हल्ल्यास जोरदार प्रतिकार केला. हल्ल्यासाठी आंगावर झेपालेल्या बिबट्याला दोन्ही हाताने दूर फेकल्याने बिबट्याने घटनास्थळावरून पळ काढला. मणकर्णा यांच्या तत्परतेबरोच धाडसामुळे पुढील अनर्थ टळला.**

केंद्रात उपचार करण्यात आले. रुपूर शिवारातील वाघाबाचे शेतात मणकर्णा शिवराम नेटके वय (५५ वर्षे) या कापुस वेचणी करीत असताना दुपारी साधारण ३:०० च्या सुमारात पान २ वर

# लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यासमोर शेतकऱ्याचे अर्ध नग्न आंदोलन

## नोंद येऊन ही कारखाना ऊस गाळपास घेऊन जात नाही म्हणून केले आंदोलन

माजलगांव दि.२१(प्रतिनिधी):-उसाची नोंद येऊन ही ऊस गळतात कारखाना ऊस नेत नसल्यामुळे लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यासमोर सुलतानपूर येथील शेतकरी रावसाहेब भाऊराव नावडकर यांच्या मुलगा तुकाराम नावडकर यांनी दिनांक २१ जानेवारी रोजी कारखान्यासमोर अर्ध नग्न आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

माजलगाव धरण गोदावरी नदीवरील बंधारे यामुळे तालुक्यात मुबलक पाणी उपलब्ध असल्यामुळे माजलगाव तालुका हा ग्रीन बेल्ट म्हणून मराठवाड्यात नावलौकिक झाला आहे या तालुक्यांमध्ये दरवर्षी ३० ते ३५ लाख मॅट्रिकटन उसाचे उत्पादन होत आहे तालुक्यामध्ये तीन सहकारी साखर कारखाने गुळ युनिट असूनही शेतकऱ्यांचे ऊस गाळपासाठी हाल होताना दिसून येत आहे असाच प्रत्यय माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथील शेतकरी रावसाहेब भाऊराव नावडकर यांचा सुलतानपूर येथे गट क्रमांक १४४ मध्ये ०१ हेक्टर २० आर लागुन उसाची नोंद दि.१५ डिसेंबर २०२५ होती उसाची नोंद येऊन ही लोकनेते सुंदर सोळंके सहकारी साखर कारखाना प्रशासनाकडून आज उद्या नेहु म्हणत शेतकऱ्याला नुसत्या चकरा पान २ वर



# आज श्रीक्षेत्र कपिलधार येथे शिवदीक्षा संस्कार कार्यक्रम

## श्रीगुरू चंद्रशेखर शिवचार्य महाराजांच्या उपस्थितीत धर्मसभा होणार

माजलगाव (प्रतिनिधी):- श्रीक्षेत्र कपिलधार येथे श्रीमन्मथधाम श्रीगुरू माजलगावकर महाराज मठात गुरूवार, दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी १० ते १ या वेळेत श्रीमिस्कीन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवचार्य महाराज यांच्या सानिध्यात शिवदीक्षा संस्कार कार्यक्रम होणार असून रात्री ६ वाजता धर्मसभा होणार आहे. तरी भाविकभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीगुरू माजलगावकर प्रासादिक मंडळाच्या



वतीने करण्यात आले आहे. संत शिरोमणी श्री मन्मथ स्वामी यांचा ४६८ वा जन्मोत्सव व ४८ वा कुंभमेळावानिमित्त माजलगाव शिवसंप्रदाय प्रसादिक मंडळ श्रीक्षेत्र कपिलधार आयोजित सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्यापासून श्री १०८ ष.ब्र. गुरू तपोरत्नं प्रभू पंडीताराध्य शिवाचार्य महाराजा पर्यंत जी अखंड गुरू परंपरा चालत आलेली आहे. माघ शुध्द पंचमीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे माजलगाव ते कपिलधार पायी दिंडीचे भव्य स्वरूपात सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे मठाधिपती चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले. याला मोठा प्रतिसाद देत समाजातील भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून यंदाची ही पायी दिंडी भव्य दिव्य स्वरूपात श्रीक्षेत्र कपिलधार येथे पोहचली. शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी रोजी पासून बुधवार, दिनांक २१ जानेवारी रोजी पर्यंत ही पायी दिंडी दैदीप्यमान पान २ वर



पुणे येथे सिंधी समाजाचे बिल्डर्स परमानंद जमतानी, मनोहर जेठवाणी, श्रीचंदसेठ गुंडियाल यांना हिंद-दी-चादरचे निमंत्रण व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना डॉ.एम.बी.जेसवाणी - बीड जिल्हा अध्यक्ष सिंधी व पंजाबी समाज.

# लवूळ येथे आज शिव महापुराण कथेची सांगता

लवुळ दि.२१(प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील लवूळ क्रमांक १ येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवमहापुराण कथेचे आयोजन दि.१६ जानेवारी शुक्रवार पासून प्रारंभ होऊन दि.२२ जानेवारी गुरुवार या दिवशी या कथेची सांगता होत आहे. या सात दिवसाच्या कथेमध्ये शिवकथा प्रवक्त्या साध्वी नीतादीदी चैतन्य मुद्रेगाव, यांनी शिवमहापुराण कथेतून अनेक प्रसंग सांगताना म्हणाले की, आजच्या युगात सर्वांनी नामस्मरण करणे गरजेचे आहे तरच आपल्या जीवनाचे सार्थक होते. महादेव आणि पार्वतीने अनेक संकटावर मात करीत आज देवाचेदेव म्हणजे महादेव. आपल्या जीवनात अनेक संकटे येत असेल तर तुम्ही सतत महादेवाचे नामस्मरण करा आणि मनातून रोज मंदिरात जाऊन आपले मन शांत करून नतमस्तक व्हा नक्कीच तुम्हाला याचा फायदा येणाऱ्या संकटावर होईल. शिवमहापुराण कथेमध्ये अनेक महादेवजीचे आणि पार्वतीमातेचे प्रसंग सांगितलेले आहे. या सात दिवसाच्या कालावधीत येथील सर्व गावातील महिला पान २ वर

# जयदत्त धस यांची पाटोदा तालुक्यात विविध कार्यक्रमांना उपस्थिती



पाटोदा दि.२१(प्रतिनिधी):- आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश अण्णा धस यांचे चिरंजीव व युवा नेते जयदत्त धस यांनी पाटोदा तालुक्यातील विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधला.

सुप्पा गंडाळवाडी (ता. पाटोदा) येथील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गड येथे आयोजित श्री धर्मनाथ बीजउत्सव सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहात जयदत्त धस यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी हरिकीर्तन श्रवणाचा लाभ घेतला तसेच उपस्थित भाविकांशी संवाद साधला. तसेच वैजाळा येथे कल्याण आप्पाराव येडे यांच्या निधनाची माहिती मिळाल्यानंतर जयदत्त धस यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले व दिवंगतास श्रद्धांजली अर्पण केली. याच दरम्यान कै. सुनंदा पांडुरंग ढास यांच्या तेराव्याच्या कार्यक्रमालाही त्यांनी उपस्थिती दर्शवून श्रद्धांजली वाहिली.मंझेरी येथे आबासाहेब नांदे (महाराज) यांचे वडील स्व. रामभाऊ नांदे यांच्या निधनानंतर जयदत्त धस यांनी नांदे कुटुंबीयांची प्रत्यक्ष पान २ वर

# महिलांच्या पंढरीत हरिनामाचा गजर

## महासांगवीत संत मीराबाई आईसाहेब पुण्यतिथी निमित्त भक्ती,वैराग्य आणि आरोग्याचा संगम

पाटोदा- ( महेश बेदरे ) :- संपूर्ण महाराष्ट्रात महिलांची पंढरी म्हणून ओळख असलेल्या पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र संत मीराबाई आईसाहेब संस्थान, महासांगवी येथे येत्या शनिवार दिनांक २४ जानेवारीपासून भक्तिरसाचा अखंड प्रवाह सुरू होणार आहे. सिद्ध संत मीराबाई आईसाहेब यांच्या २८व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहामुळे महासांगवी परिसर पुन्हा एकदा हरिनामाच्या गजराने दुमदुमणार असून, हजारो भाविकांच्या उपस्थितीत अध्यात्मिक वातावरण निर्माण होणार आहे.



महाराष्ट्रातील एकमेव महिलांची गादी असलेल्या या पवित्र क्षेत्रात मठाधिपती ह.भ.प. महंत राधाताई महाराज आईसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याची तयारी पूर्ण झाली आहे. भाविकांसाठी भव्य मंडप उभारण्यात आला असून दर्शन, कीर्तन आणि इतर धार्मिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या आयोजनामुळे महासांगवी हे ठिकाण पुन्हा एकदा राज्यातील प्रमुख अध्यात्मिक केंद्र म्हणून अधोरेखित होणार आहे.

सिद्ध संत मीराबाई आईसाहेब या त्याग, वैराग्य आणि भक्तीची मूर्ती म्हणून ओळखल्या जातात. सन १९९८ मध्ये त्यांच्या देहावसानानंतर महंत राधाताई महाराज यांनी मठाधिपती म्हणून सूत्रे स्वीकारली. गेल्या २८ वर्षांत त्यांच्या नेतृत्वाखाली पान २ वर

# पाटोदा प्रीमियर लीग पर्व-७ साठी आ.सुरेश धस यांना निमंत्रण



पाटोदा दि.२१(प्रतिनिधी):- शहराच्या क्रीडा विश्वातील मानाची ओळख ठरलेल्या पाटोदा प्रीमियर लीग पर्व-७ (PPL-7) स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी मा. आमदार सुरेश अण्णा धस व युवा नेते सागर आप्पा धस यांची सदिच्छा भेट घेऊन औपचारिक निमंत्रण देण्यात आले. आमदार सुरेश अण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक २६ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या पान २ वर

# महाराष्ट्र राज्य जिल्हा आरोग्य अधिकारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी सचिन शेकडे

बीड दि.२१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी बीड जिल्हा परिषदेतील जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे यांची बिनविरोध नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सचिन शेकडे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी या पदासह विविध पदावर उल्लेखनीय आणि स्तुत्य काम केले आहे. संसर्गजन्य रोग नियंत्रण व प्रतिबंध प्रतिबंधक उपाययोजना, राष्ट्रीय आरोग्य अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासकीय समन्वय, कर्मचारी कल्याण, शहरी आणि ग्रामीण रुग्ण सेवा सुधारणा, या क्षेत्रात उल्लेखनीय आणि परिणामकारक काम केले आहे.

डॉ. शेकडे यांच्या निवडीचे राज्यभरात सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य प्रणाली मजबूत करण्यासाठी आणि सर्व आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रश्नांना सक्षम नेतृत्व देण्यासाठी त्यांची निवड सार्थ ठरणार




आहे. शेकडे यांचे निवडीची घोषणा होतात जिल्ह्यात सर्व स्तरातून आनंद व्यक्त करण्यात येत असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या निवडीनंतर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी रौफ, विभागीय अध्यक्ष बागलाने, जिल्हा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष कालिदास सानप यांच्यासह अधिकारी कर्मचाऱ्यांनी यांनी त्याचा सत्कार केला. डॉ. शेकडे यांच्या नियुक्तीमुळे आरोग्य अधिकारी संघटना अधिक बळकट आणि सक्षम होईल अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त करण्यात आली आहे.

## बीड जिल्हा परिषद सीईओने केली कारवाई

# वर्गात झोपा काढणारे दोन गुरुजी निलंबित

धामणगाव दि.२१(प्रतिनिधी)- ज्यांना ज्ञानदान करण्यासाठी शासनाने पगारी शिक्षक म्हणून रुजू करून घेतले त्यावेळी त्या शिक्षकाकडे मुलं घडवण्याची जबाबदारी असते आणि हे शिक्षक जर शाळेत विद्यार्थ्यां समोर झोपा काढत असतील तर विद्यार्थ्यांनी त्या शिक्षकांचा काय आदर्श घ्यायचा असाच एक खळबळ जनक प्रकार आष्टी तालुक्यातील खडकत येथील पारगाव जोगेश्वरी केंद्रांतर्गत येणाऱ्या खडकत येथील( शंकर नगर वस्ती ) येथील शाळेतील दोन शिक्षकांच्या बाबतीत घडला आहे





या दोन शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी याबाबत आदेश जारी केले मन्मथ देविदास उटकुलवाड व अनिल रामनाथ उदावंत असे शिक्षकांची नावे आहेत खडकत येथील शंकर नगर वस्तीवर पहिली ते चौथीपर्यंत जिल्हा परिषद शाळा असून दोन शिक्षक व सहा विद्यार्थी आहेत या शाळेत कार्यरत दोन शिक्षक हे शाळेत झोपा काढत असून मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करत असल्याने या शाळेची पान २ वर

# डांबर रस्ता व बांध, पाणंद रस्त्यासाठी उद्यापासून माकप सादोळाच्या वतीने कृष्णा सोळंके यांचे आमरण उपोषण

माजलगाव दि २१(प्रतिनिधी)- गेली अनेक वर्षापासून सादोळा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (न्यू हायस्कूल शाळा) ते जी परिषद शाळा सादोळा इथ पर्यंतचा रस्ता खराब झाला असून यासाठी ना सत्ताधारी ना स्वतःला विरोधक समजणारे लोक याकडे लक्ष देत नाहीत. सदर डांबर रस्ता करण्यासाठी व आनंद रस्त्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष साधूळाच्या वतीने कृष्णा सोळुंके यांनी २३ जानेवारीपासून आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा दिला आहे.

प्रसिद्धी पत्रकात नमूद केले की सादोळा शिवारातील शेत रस्ता, पाणंद रस्ता, शिव रस्ता व बांध रस्ते अतिक्रमित आहेत शेतकऱ्यांना आपल्या शेतात



जाण्या येण्यासाठी रस्ताच नाही व न्याय मागण्यासाठी गेले तर तारखावर तारखा तहसील प्रशासन देते आणि यामुळे अडवणाऱ्या व अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्याला प्रशासनाची वचक यांना राहिलेली नाही नकाशावर असणारे परंतु अतिक्रमण केलेले पाणंद रस्ते,शिव रस्ते, व बांध रस्ते देखील प्रशासनाने ठोस सार्वजनिक निर्णय घेण्याची गरज आहे, त्यामुळे कुणाच्या तक्रारीची वाट न पाहता सर्वांना लागू होईल असा निर्णय तहसील प्रशासनाणे घ्यावा आणि ही कामे योजनेतून मजबुतीकरण करण्यात यावी, या मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष शाखा सादोळा च्या वतीने शाखा सचिव कॉम्रेड कृष्णा सोळंके यांनी जोपर्यंत या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे, १९ व २० जानेवारीला तहसील कार्यालय, उप कार्यकारी अभियंता माजलगाव, व गट विकास अधिकारी पंचायत समितीला पान २ वर